# Project Completion Report

A Minor Research Project Entitled

# "Studies on the Impact of Religiour Places on Socil Life During the Period of Sir Parashurambhau Patwardhan (1740 to 1799)"

**File No -23-740/13 (WRO) dated 30th May 2014**

**Submitted for Financial Assistance to**

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

(WESTERN REGIONAL OFFICE, PUNE)

**Mr. G. K. Patil**
(Assistant Professor)
Department of History

**Padmabhushan Dr. Vasantraodada Patil Mahavidyalaya, Tasgaon - 416312
Maharashtra, India**

**Aug 2020**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषयाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्रकरण १ | विषय निवडण्याचे कारण व अभ्यासाचे महत्व | १ ते १८ |
| प्रकरण २ | तासगांवचा इतिहास व पटवर्धन घराणे | १९ ते ३७ |
| प्रकरण ३ | उत्तर पेशवाईतील पराक्रमी योध्दा – सेनाकर्ते सर परशुरामभाऊ पटवर्धन. | ३८ ते ५१ |
| प्रकरण ४ | सर परशुरामभाऊंच्या धार्मिक उत्सवातून समाजावर झालेला सामाजिक परिणाम | ५२ ते ६९ |
| प्रकरण ५ | अभिप्राय, धार्मिकतेतून सामाजिक ऐक्य साधलेले मुलखावेगळे संस्थान, तासगांव | ७० ते ८२ |
| प्रकरण ६ | संदर्भ साधने | ८३ ते ८५ |

# कृतज्ञतेचे दोन शब्द

छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून चोहोबाजूनी हे राज्य विस्तारले, रक्षिले त्यांच्यानंतर छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांनी कमालीचे स्वराज्यासाठी योगदान दिले. पराक्रम सार्थ ठरविला.

महाराणी ताराबाई कालीन संघर्षाला ''मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द'' म्हणतात. २० फेब्रुवारी १७०७ ला औरंगजेब बादशहाचे निधन झाले त्याच्या दोन पुत्रात आज्जमशहा व मुअज्जम (शहाआलम) दिल्लीच्या सत्तेसाठीचा संघर्ष सुरू झाला. तेव्हा आज्जमशहास झुल्फीकारखानाने सल्ला दिला की, उत्तरेकडे जाताना दक्षिणेत शांतता ठेवायची असेल तर आपल्या कैदेत असणाऱ्या शाहू महारांना मुक्त करावे म्हणजे मराठ्यांच्यात यादवी लागेल. हा सल्ला आज्जमशहास योग्य वाटून त्याने ८ मे १७०७ ला शाहू सोडून दिले. शाहूचे स्वराज्यात आगमन होताच महाराणी ताराबाईशी सख्य न झाल्याने आणि १२ ऑक्टोंबर १७०७ ची खेडची लढाई शाहू महाराजांनी जिंकल्याने मराठ्यांच्यात यादवी युध्द होऊन सातारा – शाहू महाराज व कोल्हापूर महाराणी ताराबाई दोन गाद्या झाल्या.

सातारच्या शाहूराजांचे बरेचसे आयुष्य मोगलांच्या कैदेत गेले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या राज्याला बळकटी देण्यासाठी बाळाजी विश्वनाथांना इ. स. १७१३ ला वंशपरंपरागत पेशवाई दिली. १७२० ला बाळाजीच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा पहिला बाजीराव (१७२०–१७४०) पेशवेपदावर आल्यानंतर शाहूंनी त्यास पुणे प्रांताची जहांगिरी दिली. तेथे त्याने शनिवारवाडा बांधला. त्यांच्यानंतर नानासाहेब, माधवराव या शूर, धाडशी पेशव्यानी मराठा राज्याचे अटकेपार झेंडे लावून स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. पण १७४९ ला शाहू राजांच्या निधनानंतर पेशवे हेच दौलतीचे कारभारी बनल्याने सातारचे महत्व कमी झाले.

पेशव्यांनी उत्तरेत शिंदे, होळकर, पवार यांना संधी दिली. तर दक्षिणेत हरभटबाबा पटवर्धन घराण्याला संधी दिली. ही सर्व पटवर्धन मंडळी मुत्सध्दी योध्दे व कुशल प्रशासक होते. निर्णयक्षमता प्रचंड होती. सातारा आणि पेशवे यांच्याशी असलेली स्वामीनिष्ठा पाहून त्यांना मिरज, कुरूंदवाड, तासगांव हा भाग जहागिर मिळाला त्यांनी सोईनुसार तो भाग वाटून घेतला.

या सर्व संस्थांनी शाखांपैकी तासगांव संस्थानाला पेशवे दरबारात अत्यंत मानाचे स्थान मिळाले. याचे कारण सर परशुरामभाऊ पटवर्धन (१७४० — १७९९) यांचा पराक्रम होय.

सर परशुरामभाऊ रणांगणावरील पराक्रमाइतकेच मुत्सद्दी प्रशासक होते. संस्कृत पठण, पत्रलेखन, मर्दुमकी यात अग्रेसर असणाऱ्या भाऊंनी शंभर लढाय्या केल्या.

सर परशुरामभाऊ पटवर्धन हे गणपती पुळ्याचे गणेशाचे वडीलांच्या प्रमाणेच निस्सिम गणेश भक्त होते. माझे संस्थान व माझा पराक्रम हा गणेशाचा आशिर्वाद समजत. त्यामुळे त्यांनी तासगांवला ९७ फुट उंचीचे उजव्या सोंडेचे गणपती मंदिर बांधले आणि रथोत्सव सुरू केला. लोकमान्य टिळकांनी जो सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला (१८९३) त्याच्या अगोदर १०६ वर्षे भाऊंनी हा उत्सव सुरू केला. यात सर्व जाती जमातीच्या लोकांना मानकरी केले. पुण्यात जेव्हा जातीयतेचे प्रचंड स्तोम होते तेव्हा पेशव्यांचा हा मुलुख वेगळा सरदार आपल्या संस्थानात धार्मिकतेतून सामाजिक एकता निर्माण करीत तासगांवला आधुनिक रूप देत होता. भाऊंनी आपल्या काळात जवळपास १४ मंदिरे बांधली. धर्मशाळा, घाट बांधला. पूर्वीच्या मंदिरांचा जिर्णोध्दार केला. संस्थांना बाहेर मंदिरे बांधली. नारळाच्या बागा लावून कोकणच्या सौंदर्याचे रूप दिले. पुणे, कर्नाटक प्रांतातून लोकांस आणून व्यापार वाढविला. त्यांनी स्थापत्य कलेला दिलेला आश्रय तासगांवातील मंदिरे, वाडे पाहता अभिमानाने असे म्हणावे लागेल.

“Pathvardhan Sansthan was a temple city during the Peshwae Period”

सर परशुरामभाऊंचे संस्थान परकीयांना देखील भावले होते. फ्रेंच इतिहासकार डयू पिरॉन (१७४०), ब्रिटीश सैन्य प्रमुख मेजर प्रीस (१७९०) ऑर्थर वेलस्ली, कॅप्टन लुक्स (१८२७) यांनी भेटी देऊन त्यांना गौरविले. आपल्या नोंदीत परशुरामभाऊंना वेगळे स्थान दिले. तेव्हा परशुरामभाऊंच्या या मुलखावेगळ्या पराक्रमाचा, सामाजिक समतेच्या संदेश रथोत्सवाच्या व मंदिर स्थापनेच्या माध्यमातून देणाऱ्या मराठ्यांचा सेनाकर्ते सर परशुराम भाऊ पटवर्धन म्हणून सन्मानीत झालेल्या एका योध्द्यासारखे एका धार्मिकतेतून सामाजिक ऐक्याची दृष्टी देणाऱ्या संस्थानिकाचा अभ्यास व्हावा. तासगांवचे नांव सर्वोतोमुखी करणाऱ्या भाऊंना अभिवादन करण्यासाठी नव्या पिढीला भाऊंची दृष्टी मिळावी म्हणून हा प्रोजेक्ट मी घेतला.

मी स्वत: लेखक असल्याने, गणेशभक्ती ही माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने एका गणेशभक्तावर दुसऱ्या गणेशभक्ताने लिहावे. नव्या पिढीला राष्ट्रीय ऐक्याचा संदेश भाऊंच्या कारकीर्दीतून, धोरणातून मिळावा. यासाठी तुम्ही हा प्रोजेक्ट घ्या असे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी मला सुचविले. त्यांच्या रूपी गणेशानेच मला ही संधीची वाट दाखवली त्यामुळे मी मार्गस्थ झालो. प्राचार्य मिलींद हुजरे हे माझे केवळ मित्र नाहीत तर दोन विचारांच्या सुरेल संवादातील ती वीण आहे. त्यांनी मला प्रोजेक्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाची, साधनांची उपलब्धता करून दिली. हे काम मी पूर्ण करू शकलो ते प्राचार्य अनिल पाटील यांच्या सौभाग्यवती सुलोचना संकपाळ यांच्या सहकार्यामुळे त्यांनी पटवर्धनांच्यावर अभ्यास केला असून लिखाणही केले आहे. त्यांचा उपयोग मला मोलाचा झाला. टंकलेखनाचे काम चैतन्य कुलकर्णी त्यांचे सहकारी यांनी उत्कृष्ठ केले आहे. शिवाय श्री कदम एम. बी. ऑफीस सुपरिडेंट यांनी अनमोल मदत केली. म्हणूनच मी हा प्रोजेक्ट पूर्णत्वास नेऊ शकलो. या

शिवाय सर परशुराम भाऊंचे वारसदार राजेंद्र पटवर्धन यांनी मला साधन सूचीता उपलब्ध करून दिली. मी त्यांच्या मुलाखती घेतल्या. सोमवार पेठेतील विठ्ठल मंदिराचे व्यवस्थापक रामचंद्र कोळेकर तसेच प्राचार्या भारती पाटील, डॉ. सी. जी. पाटील यांच्या प्रबंधाने मला नव्या वाटा दाखविल्या. त्यामुळे मला अत्यंत मार्मिक पध्दतीने, योग्य दिशेने लिखाण करीत हा प्रोजेक्ट आपणाला सादर करता आला आहे. या सर्वांच्या ऋणात मी कायम राहीन. आपण गोड मानून हा प्रोजेक्ट स्विकाराल हीच अपेक्षा ठेवीत उत्तर पेशवाईतील मराठ्यांचे सेनाकर्ते सर परशुरामभाऊ पटवर्धन व श्री सिध्दी विनायकास अभिवादन करतो.

तासगांव

दि. ऑगस्ट, २०२०

प्रा.जी.के.पाटील

# प्रकरण – १

## विषय निवडण्याचे कारण व अभ्यासाचे महत्व

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | विषयाची पार्श्वभूमी. मराठी सत्तेचा उदय, विकास |
| २ | तासगांवची ऐतिहासिक पार्श्वभूमी |
| ३ | तासगांव नावाची उत्पत्ती |
| ४ | पटवर्धन घराणे |
| ५ | परशुरामभाऊ पटवर्धनांचा धार्मिक व सामाजिक दृष्टीकोन |
| ६ | प्रोजेक्टचा इतर विषयाशी संबंध |
| ७ | प्रोजेक्टचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील महत्व |
| ८ | प्रोजेक्टची उद्दिष्टे |
| ९ | संशोधन साहित्य व संशोधन पध्दती |
| १० | संदर्भ सूची |

# प्रकरण १

## विषय निवडण्याचे कारण व अभ्यासाचे महत्व

छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हे करताना त्यांनी महाराष्ट्रातील सर्व जाती धर्मांचे संघटन करून स्वधर्म रक्षणासाठी यौवनी अत्याचारातून मुक्तता करण्यासाठी आणि निर्भयपणे रयतेला जीवन जगता यावे यासाठी हिंदवी स्वराज्याच्या विचाराने भारावून टाकले. स्वराज्य, स्वधर्म स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती यांच्या रक्षणासाठी लढण्याची व प्रसंगी आत्मसमर्पण करण्याची प्रेरणा लोकांना दिली. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यासारख्या प्रबल सत्तांशी संघर्ष करून मराठी सत्तेला स्थैर्य दिले. ६ जून, १६७४ ला राज्याभिषेक करून स्वतंत्र सार्वभौम राज्याची निर्मिती केली. स्वत:चे होन व शिवराई ही नाणी काढली या स्वराज्याची धुरा छत्रपतींच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी येसूबाई यांनी अत्यंत समर्थपणे शत्रुंशी कडवी झुंज देत सांभाळली.

२० फेब्रुवारी, १७०७ ला औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाला आणि हिंदूस्थानच्या इतिहासाला नवे वळण लागले. दिल्लीचे तख्त आणि बादशाही मिळवण्यासाठी त्यांचे पुत्र आज्जमशहा व वाहआलम (मुअज्जम) यांच्या संघर्ष सुरू झाला. सत्तेचे सिंहासन घेण्यासाठी आजमशहा दक्षिणेतून दिल्लीच्या रोखाने निघाला तेव्हा त्याचा सेनापती झुल्फीकारखानने मराठी राज्यात यादवी निर्माण होऊन राज्य दुबळे व्हावे यासाठी आज्जमशहास शाहूची सुटका करण्याविषयी सुचविले. त्यानुसार ८ मे, १७०७ ला संभाजीपुत्र शाहूची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली आणि त्यानंतर मराठी राज्यात शाहू आणि महाराणी ताराबाई यांच्यात सत्तेसाठीचा संघर्ष होऊन मराठयांच्यात सातारा (शाहू) व कोल्हापूर

(ताराबाई) अशा दोन गाद्या वारणेच्या तहाने (१३ एप्रिल १७३१) झाल्या व १७०७ पासून सातारा व कोल्हापूर मध्ये सुरू असलेली यादवी पूर्णपणे संपुष्टात आली.

सातारच्या छत्रपती शाहूचे राज्य बळकट करण्यात बाळाजी विश्वनाथांनी प्रयत्न केल्याने शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना वंशपरंपरागत पेशाबाईची वस्त्रे दिली. (१७ नोव्हें. १७१३) त्यामुळे मराठी राज्याच्या इतिहासात नवे आयाम तयार झाले. १८१८ अखेर पेशवे पद बाळाजी विश्वनाथांच्या घराण्यात अनुवंशीक राहिले. बाळाजी विश्वनाथांचा मृत्यु १७२० ला झाल्यानंतर त्यांचा मुलगा पहिला बाजीराव १७२० ते १७४० या कालावधीत पेशवा झाले. त्यांना शाहू महाराजांनी पुणे परगाण जहांगीरी दिली आणि पुणे येथे त्यांनी शनिवारवाडा बांधून प्रशासनाला सुरूवात केली त्यामुळे साताराचा कारभार पुण्याहून होऊ लागला. बाजीरावांनी अटकेपार झेंडे लावून स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. १८१८ अखेर नानासाहेब (१७४० ते १७६१) माधवराव (१७६१ ते १७७२) यांनीही राज्य शिकस्तीने राखले.

१५ सप्टेंबर १७४९ ला शाहू महारांच्या मृत्युनंतर पेशव्यांनी उत्तरेच्या राजकारणात प्रभावशाली महादजी शिंदे, यशवंतराव होळकर, भोसले, गायकवाड, पवार या सारख्या मुत्सद्दी, धडाडीच्या सरदारांना संधी दिली. त्यांनी स्वपराक्रमे मराठयांचा उत्तरेत दबदबा निर्माण केला तर दक्षिणेत पटवर्धन घराण्याचा उदय झाला. या घराण्याचा मुळ पुरूष हरभटबाबा पटवर्धन असून त्यांच्या सहाही पुत्रांनी मराठी राज्याच्या विकासासाठी विस्तारासाठी पराक्रम केला आहे. त्यांची पेशव्यांशी असलेली एकनिष्ठता व पराक्रम सिध्दता पाहून पेशव्यांनी पटवर्धनांना मिरज, कुरूंदवाड, सांगली, तासगांव या भागात जहागिरी दिल्या.

कसबे तासगांव परगाण्याचे सर परशुरामभाऊ पटवर्धन हे मराठा राज्याचे सेनाकर्ते होते. ते महापराक्रमी, मुत्सद्दी, राजकारण निपुण योध्दे होते. वयाच्या १४ वर्षी हाती तलवार घेऊन ४० वर्षे मराठी राज्य रक्षिले. पेशवे पदाच्या शह

— कारशाहात रममाण असणाऱ्या रघुनाथरावांच्या महत्वाकांक्षेला त्यांनी यशस्वी प्रतिबंध केला. बारभाईच्या राजकारणात त्यांचा सल्ला व भूमिका महत्वाची मानली जात असे. सर परशुरामभाऊ पटवर्धन स्व:पराक्रमे उत्तरपेशवाईच्या काळात मराठी राज्याचे रक्षणकर्ते ठरले. ते जसे महान पराक्रमी होते. तसे धार्मिक होते त्यांच्या काळात त्यांनी धार्मिक सणवार उत्सवातून व तासगांवला श्रीगणेशाचे ९७ फुट उंचीचे मंदिर उभारून लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अगोदर १०६ वर्षे सार्वजनिक रथोत्सव सुरू केला. या रथोत्सवात सर्व धर्माच्या लोकांना मानकरी बनवून, सन्मानीत करून सामाजिक सलोखा धार्मिक उत्सवाच्या माधमातून केला. आपल्या परगाण्यात देवस्थानांना जमिनीच्या रूपाने इनामे दिली. पूजा व्यवस्था लावली. कृष्णेवर घाट बांधला अशा विविध स्थापत्य बांधकामातून स्थापत्य शैली विकसीत करीत तासगांवला वैभव दिले. राजकीय सामाजिक, धार्मिक क्षेत्रात आपल्या कर्तबगारीचे पैलू दाखविले. एकसंघ समाज निर्माण करण्यात त्यांच्या एवढा यशस्वी सेनाकर्ता सापडणे दुरापास्त तेव्हा अशा कर्तबगार मराठा सेनानीचा 'सर परशुरामभाऊ पटवर्धन काळी (१७४०—१७९९) धार्मिक स्थळांचा समाजावर झालेला परिवर्तनाचा अभ्यास व्हावा म्हणून हा विषय मी निवडला आहे.

# - तासगांवची ऐतिहासिक पार्श्वभूमी -

तासगांव परगाण्याला मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत मानाचे स्थान होते. १२ व्या शतकात हा परगाणा देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्यात येत होता.[१] १३४७ मध्ये हसन गंगु याने कर्नाटकातील गुलबर्गा येथे वहामनी राज्याची स्थापना केली त्यावेळी त्याने अब्दुल मुजफ्फर अल्लाउद्दीन बहामन शहा अशी पदवी धारण केली.[२] याचे राज्य १५० वर्षे टिकले. या काळात एकूण चौदा सुलतान झाले. बहामनी सुलतान निजामशाहा व तिसऱ्या महम्मदाच्या कारकीर्दीत बहामनी राज्य नष्ट झाले असते. परंतु बहामनी सत्तेचा शेवटचा वजीर महम्मद गवानचा चांगला कारभार व सुधारणामुळे बहामनी सत्ता काही काळ टिकून होती. या काळात तासगांववर बहामनीची सत्ता होती. १५२६ ला महम्मद गवानच्या मृत्युनंतर बहामनी राज्याचे पाच छकले पडली. विजापूरची आदिलशाही अहमद नगरची निजामशाही गोवळकोंडयाची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही आणि बिदरची बिदरशाही[३] पैकी विजापूरच्या आदिलशाही प्रदेशात तासगांव परगाणा होता.

१७ व्या शतकात छत्रपतींनी हिंदवी स्वराज्याचा विस्तार करीत असताना १० नोव्हेंबर १६५९ ला प्रतापगडच्या पायथ्याशी अफजलखानाचा वध केला व स्वराज्य विस्तारासाठी सहयाद्री घाटावरील विजापूर करांचा मुलुख घेतला. वाई प्रांत घेऊन कृष्णा खोऱ्यातील खटाव, मायणी, अष्टे, मसूर, तासगांव व कराडचा मुलुख काबीज केला.[४] तेव्हापासून पेशावाई सत्तेच्या अखेरपर्यंत (१८१८) तासगांव मराठीसत्तेच्या इतिहासाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. १३ एप्रिल १७३१ ला कोल्हापूरचे संभाजीराजे व शाहू महाराज सातारा यांच्यात जो वारणेचा तह झाला त्यानुसार कलम ९ प्रमाणे मिरज प्रांत, विजापूर प्रांताची ठाणी देखील अथणी, तासगांव शहू महाराजांकडे आले.[५] संभाजी राजांनी सातारच्या शाहू राजांना जी गावे देणगी दाखल दिली होती त्यापैकी तासगांव परगाण्याबाबत १७५८ ला फ्रेंच विद्वान ॲनक्वेती द्यू पेरन तासगांवचे वर्णन 'एक तट बंदी

असलेले नगर की, जे मोठ्या मनोऱ्यांनी एका खंदकाने संरक्षित आहे' तसेच त्याने भोवतालच्या बहारदार निसर्गाचा देखिल उल्लेख केला आहे.[६] पटवर्धनांच्या अगोदर कोल्हापूरच्या वतीने धुळगावचे डुबल काम पहात १७६१ ला पानिपत युध्दाच्या पराभवाचा धक्का बसून नानासाहेब पेशवे यांचा अंत झाला. त्यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र थोरले माधवराव पेशवे झाले. त्यांना हरभटबाबा पटवर्धनांचे सर्व वंशज विश्वासार्ह व निष्ठावंत वाटले. दाजीसाहेब पटवर्धन व परशुराम भाऊ पटवर्धन हे त्यांचे खास निकटवर्ती झाले. थोरल्या माधवरावांनी सर्व सख्ख्या चुलत पटवर्धन बंधूंना मिरज, तासगांव, मंगळवेढा अशा ठिकाणी सरदारकी दिली. १७७१ ला परशुराम भाऊंना तासगांवचे सरदार नेमण्यात आले[७] तेव्हा पासून भाऊंनी श्रीमंत पेशवे (पुणे) व सातारकर छत्रपती भोसले यांच्याबरोबरचे इमान प्रामाणिकपणे जपत परगाणा तासगांवचा विकास केला. उत्तरेत आणि दक्षिणेत मराठेशाहीच्या अंमलाची जी लाट आली त्यात दक्षिणेकडे श्रीरंगपट्टणपर्यंत जाऊन धडकणारे परशुराम भाऊ पटवर्धन होत.

सर परशुरामभाऊ पटवर्धनांनी वयाच्या १४ व्या वर्षी तलवार हाती घेऊन वयाच्या ६० व्या वर्षापर्यंत दक्षिणेत अद्वितीय पराक्रम केला व तासगांव दक्षिणेच्या राजकारणाचे, लष्करी युध्द कौशल्याचे प्रमुख केंद्र ठरले. पुण्याच्या शनिवारवाड्यात तासगांव म्हटले की परशुरामभाऊ पटवर्धन असे अभिमानाने लोक म्हणत. मराठे शाहीपासून स्वातंत्र्योत्तर काळातही आजअखेर तासगांव राजकीय क्षेत्रावर जे प्रभावशाली ठरले त्याचा पाया परशुरामभाऊ पटवर्धनांचे कर्तृत्व आहे. म्हणून एका राजकीय मुत्सद्दी योध्दयाच्या सामाजिक आणि धार्मिक निर्णयात वेगळेपणा होता. समतेचा विचार होता आणि त्या काळात महाराष्ट्रात दिशा देणारा होता. अलीकडच्या भाषेत पटवर्धन पॅटर्न म्हटले तरी वावगे होणार नाही. इतपत तासगांवची उंची वाढली गेली हे इतिहासाला मान्यच करावे लागेल.

# - तासगांव नावाची उत्पत्ती -

तासगांव नांव कसे पडले याविषयी अनेक लोककथा असून असे म्हटले जाते की, तास हा दैत्य होता त्याला हटकेश्वराने हाटकून मारले. हाटकेश्वर हे पाताळातले दैवत होते. त्यांने तास या दैत्याला मारल्यावरून तासगांव नांव पडले.[८] दुसरी अशी दंतकथा ओ की, पूर्वी लोक घोड्यावरून प्रवास करीत सांगली ते विटा किंवा मिरज ते विटा असा प्रवास करीत असताना घोडेस्वार विश्रांतीसाठी एक तास झाला की थांबत व तासगांव हे मध्यावर असल्यामुळे घोडेस्वार येथे थांबत या एक तासावरून शहरात तासगांव नांव मिळाले.[९] तसेच आणखी एक कथा सांगितली जाते या कथेनुसार भिलवडी माळवाडीवरून भाऊसाहेब पटवर्धन तासगांव येण्यास निघाले त्यांच्या बरोबर तास नावाचा पक्षी आला यावरून तासगांव नांव पडले.[१०] इतिहास कालीन माहितीप्रमाणे १७५८ मध्ये हे शहर कडेकोट तट व त्याच्या भोवती दाट खंदकाने बंदीस्त होते. बंदिस्त तट व खंदकाचा सध्या नाश झाला आहे.

## पटवर्धन घराणे -

या घराण्याचा मुळ पुरूष ह.भ.प. हरभटबाबा पटवर्धन हे मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवडे येथील त्यांचा काळ १६५५ ते १७५० आहे. गणपतीपुळे येथील स्वयंभू श्री गणेशाची पूजा यांच्या घराण्याकडे होती. २१ वर्षे त्यांनी गणेशाची खडतर तपयुक्त आराधना केली. कित्येक दिवस दुर्वाच्या रसावर त्यांनी तपश्चर्या केली. १७२० च्या सुमारास त्यांना ‘श्रीं’ नी दृष्टान्त दिला व आज्ञा केली की, बाबांनी कोकण सोडून देशावर यावे म्हणजे त्यांच्या कुटूंबाचे कल्याण होईल. आणि त्यांच्या वंशजाची किर्ती दूरवर पोहोचेल.[११] त्यामुळे ते देशावर आले.

बाळाजी विश्वनाथ व हरभट पटवर्धन थोड्याफार फरकानेच देशावर (घाटावर) आले. परंतु पटवर्धन घराण्याला दुय्यम स्थानावर रहावे लागले. कारण

राजकारण पटूत्व हा गुण त्यांच्याजवळ नव्हता हरभट पटवर्धनांच्या पौराहत्यांने, लौकीकाने नारायण महादेव जोशी कापशीकर घोरपडेंचे मंत्री भारावून गेले व त्यांनी इचलकरंजीचा काही भाग इनाम म्हणून दिला. नारायणरावांचा मुलगा व्यंकटराव व बाळाजी विश्वनाथंची कन्या अनुबाई यांचे लग्न हरभट पटवर्धनांच्या मध्यस्थीने झाल्याने पेशाने घराण्याकडून पटवर्धनांना सहानुभूती प्राप्त झाली[१२] व तेथूनच पटवर्धनांचा पेशवाईत प्रवेश झाला. बाजीराव पेशवे व माधवराव पेशवे यांच्या काळात पटवर्धन घराणे उत्कर्षास पोहचले होते. गोविंद हरीना बाजीरावांचे घौडदल प्रमुख व शिलेदार इंद्रोजी कदम यांच्याकडे लेखापाल म्हणून नेमणूक केली होती. इंद्रोजीचा मृत्यु १७४१ ला झाल्यानंतर गोविंदरावाकडे घौडदलाचे नेतृत्व आले होते.[१३] गोविंदरावांचे लहान भाऊ रामचंद्रपंत यांचे इचलकरंजीकर घोरपडेशी न जमल्याने ते चिमाजी आप्पाच्या सेवेत रूजू झाले. त्या रामचंद्र पंताचे चिरंजीव म्हणजे तासगांव संस्थानाचे अधिपती मराठ्यांचे दक्षिणेतील सेनाकर्ते परशुरामभाऊ पटवर्धन त्यांची कारकीर्द १७४० ते १७९९ आहे. ते नानासाहेबांनी १७५४ ला कर्नाटकातील सावनुवर जो हल्ला केला त्यात त्यांनी अद्वितीय पराक्रम केला. नानासाहेब म्हणाले, ‘‘शाब्बास मुला शाब्बास या लढाईचे यश तुझकडे आले.’’[१४] या पराक्रमातून नानासाहेबांनी त्यांना १२ लाखाची सनद दिली. तर १७७४ ला श्रीमंत नारायणराव पेशवे यांनी तासगांवची सनद दिली. १७९९ पर्यंत भाऊचे वास्तव्य तासगांवला होते.[१५]

# परशुरामभाऊ पटवर्धनांचा धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन

मराठेशाहीच्या उत्तरार्धात ज्यांनी आपल्या पराक्रमाने शत्रुच्या डोळयात झणझणीत अंजन घातले आणि दक्षिणेत मराठी सत्तेचा दबदबा निर्माण केला त्या परशुराम भाऊंच्या पराक्रमावरती शनिवारवाडयात शाहीरांनी पोवाडे गायले. पेशव्यांनी युध्दाविषयक मोहिमात, लष्करी रचनेबाबत सल्ला घेतला. ते परशुरामभाऊ पेशव्यांचे एकनिष्ठ सेनापती व सातारकररांचे विश्वासू लढवय्ये म्हणून किर्तीवंत होते. माझ्या तलवारीतील पराक्रम हा गणेशाचा महाप्रसाद आहे. अशी त्यांची धारणा होती. ते निस्सिम गणेशभक्त होते. ते कोणत्याही युध्द मोहिमेवर जाण्याअगोदर गणपतीपुळे (रत्नागिरी) येथे जाऊन गणेशाचे दर्शन घेत. त्यांना झालेल्या दृष्टांतानुसार त्यांनी तासगांवला उजव्या सोंडेच्या गणपतीचे मंदिर बांधले. हे वैभवशाली सात मजली शिखर असलेले मंदिर असून प्रतिवर्षी भाद्रपदशुध्द प्रतिपदा। ते भाद्रपदशुध्द पंचमी। असा पाच दिवस उत्सव साजरा केला जातो. तासगांवचा गणपती मात्र दीड दिवसाचा आहे.[१६] आज २४१ वर्षे ही परंपरा अखंडीत चालू आहे. श्री गणेश तीन मजली रथात बसून आई — वडीलांना भेटण्यासाठी जातो. हा लाकडी रथ परिसरातील हजारो भाविक भक्तीभावाने ओढतात.

या रथोत्सवाचे वैशिष्टे म्हणजे हा देशातला पहिला सार्वजनिक गणेशोत्सव असून पेशव्यांकडून २००० रू खर्चापोटी दिले जात. हा रथ ओढण्यासाठी अबालवृध्दांच्यात जणू स्पर्धाच असते. या उत्सवाचे मानकरी सर्वजाती धर्माचे लोक असून गवंडी, सुतार, घिसाडी, चित्रकार, शिल्पकार, गवई, सनईवादक, पुजारी, भोई, गोंधले, किर्तनकार, शिंपी, नगारणी, गुरव, माळी, वडर असे लोक आहेत. हे सर्वजण अत्यंत गुण्यागोविंदाने जातीय सलोखा राखीत उत्सव संपन्न करतात.[१७]

ज्या काळात जातीयतेचे प्रचंड स्तोम होते. त्या काळात उत्तर पेशवाईतला हा सेनापती आपल्या संस्थानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श राजनितीचा वापर करून सर्व समाजाला न्याय देतात, समता प्रस्थापित करतात आणि जनमतात राजसत्तेवर आदर वृध्दीगत व्हावा असे निर्णय घेतात. याचा अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे. याशिवाजी संस्थानाची आर्थिक भरभराट व्हावी यासाठी विविध विभागातून व्यापारी आणून व्यापारी पेठा बसवून त्यांच्यात एकोपा निर्माण केल्याचे चित्र पहावयास मिळते.

तेव्हा धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून लोकांच्या मनात सामाजिक भान जतन व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या उत्तरपेशवाईतील मराठ्यांचा सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांच्यावर मायनर रिसर्च करून नव्या पिढीला राज्यकर्ते जर दृष्टीशाली असतील तर संस्थानात बरखत येते याचे दर्शन घडावे हाच हेतू संशोधनाचा आहे.

# -: प्रोजेक्टचा इतर विषयाशी सहसंबंध :-

**१. समाजशास्त्र :-**

१८ पगड जातीचा सन्मान करण्यासाठी सर परशुराम भाऊंची भूमिका तत्कालीन पुरोहीत वर्गाच्या धर्मांधतेला पायबंद घालणारी ठरली आहे याचा अभ्यास व्हावा.

**२. राज्यशास्त्र :-**

नारायणरावाच्या वधानंतर पेशवाईत राजकीय अस्थिरता निर्माण होऊन रघुनाथरावासारख्या महत्वकांक्षी व्यक्तीस पेशवाईची धुरा घेण्याची अंतीम इच्छा आणि त्यासाठी केलेले चुकीचे राजकारण मराठी सत्तेवर कसे दूरगामी परिणाम करणारे ठरले याचा अभ्यास व्हावा. बारभाई कारस्थानातील मंडळींनी मराठी राज्य कसे सावरले. परशुरामभाऊ पटवर्धनांची कर्तबगारी कशी उपयुक्त ठरली याचा अभ्यास व्हावा हा हेतू.

**३. भौगोलिक :-**

तासगांव परिसरात पर्जन्यप्रमाण कमी असतानाही आपल्या जहागिरीत शेतकरी सुखी व्हावा शेतकऱ्यांना अवर्षण काळातही आत्मबल प्राप्त व्हावे, शहराचे सौंदर्य वाढवावे, कोकणची प्रतिकृती नारळाच्या बागा लावून कशी करता येते हे प्रत्यक्ष नारळाची लागवड करून भाऊंनी निसर्गाशी लढण्याची जणू संदेशच दिला आहे. या त्यांच्या भौगोलिक दृष्टीचा अभ्यास व्हावा.

# -: प्रोजेक्टचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील महत्व :-

हा विषय निवडण्यामागे मुळ कल्पना अशी की महाराष्ट्रात गणेश पूजन हे अतिशय भक्तीभावाने केले जाते. शहाजी राजे, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाबाई ते बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे सर्व वंशज गणेश भक्त होते. याच परंपरेतील गणेशाचे निस्सिम भक्त ह.भ.प. हरभटबाबा पटवर्धन होते. त्यांना सहा मुले होती ती सर्व बाळाजी विश्वनाथ ते दुसरा बाजीराव म्हणजे १८१८ ला पेशवाईचा अस्त होईपर्यंत. मराठी सत्तेत केवळ सहभागीच नव्हती तर तलवारीच्या पराक्रमाच्या जोरावर या घराण्यातील जवळ जवळ ६० लोकांनी मराठेशाहीच्या रक्षणार्थ आपले प्राण समरभूमीवर गमावले त्या पराक्रमातील मुकुटमणी म्हणजे तासगावचे मराठयांचे दक्षिणेतील सेनाकर्ते सर परशुराम भाऊ पटवर्धन होत. भाऊंनी जवळजवळ शंभर लढाया करून मराठी राज्याचे संरक्षण केले. त्यांच्या या विविध पैलुंची राज्य व राष्ट्रीय स्तरावर जो आजही महत्त्व आहे. याचा अभ्यास व्हावा हेतू आहे.

१. तासगांव येथे १७९९ साली सर परशुराम भाऊ पटवर्धन यांनी १७९९ जो पहिला जो सार्वजनीक रथोत्सव सुरू केला. त्याचा इतर प्रांतातील रयतेला ही आणि राज्यकर्त्यांनाही कसा सहायभूत झाला असेल याचा अभ्यास व्हावा.
२. पेशव्यांनी सन १८०० मध्ये सालीना दोन हजार उत्सवासाठी नेमणूक दिली ती ब्रिटीश सरकारने व स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र शासनानेही आज तागायत चालू ठेवली आहे. यावरून या यात्रेचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात येते.
३. सर परशुराम भाऊंनी संस्थांनी इलाख्यात उत्सवाच्या माध्यमातून निर्माण केलेली धार्मीक व सामाजिक एकता मराठी राज्याला बळकटी कशी देत गेली याचे महत्त्व जाणून घेणे.

४. सर परशुराम भाऊंनी आपल्या संस्थानी इलाख्यातील हटकेश्वर मंदिराचा जीर्णोध्दार केला. तसेच सिध्देश्वर मंदिर, विठ्ठल मंदिराच्या नैमित्तिक खर्चासाठी जमिनी इनाम दिल्या. पुजाऱ्यांच्या नेमणूक बाहेर गावाहून काहींना आणून केल्या. पंढरपुरात पांडुरंगाचा मंडप बांधला. मुंबईला भाऊंचा धक्का बांधला. संस्थानाबाहेरही हा राजा धार्मिकता जपत सामाजिक ऐक्य कसे साधत होता याची महती सांगणे.

५. आजही इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशातून अनेक पर्यटक मंदिराला भेट देण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी येताहेत.

६. विविध जातीच्या लोकांना धार्मिक उत्सवाच्या कार्यक्रमात सहभागी होताना त्यांचेही जगणे सुखकर व्हावे म्हणून त्यांना खर्चासाठी दिलेल्या जमिन इनामाची अभ्यास करणे.

# - प्रोजेक्ट उदिष्टे -

१. धार्मिक स्थळांच्या यात्रा संपन्न करण्यासाठी सर परशुरामभाऊ पटवर्धन यांनी गावचे वतनदार पाटील, देशमुख, चौगुले, पुरोहितगिरी करणारे पुजारी यांच्यातुन उदयास आलेल्या सामुहिक समाजहित दक्ष नेतृत्वाचा अभ्यास करणे. हे नेतृत्व संस्थानी कारभारालाही कसे साह्यभूत झाले यांचा अभ्यास करणे.

२. उत्सव माध्यमातून भाऊंनी आपल्या कारकीर्दीत अठरापगड जातीच्या लोकांना गुण्यागोविंदाने एकत्रीत सन्मानपूर्वक कसे ठेवले असेल याचा अभ्यास करणे.

३. आपल्या इलाख्यातील गावागावांच्या यात्रांना भाऊ आर्थिक सहाय करीतच पण वतनदारांच्या माध्यमातून लोकवर्गणीतून लोकउत्सव कसा संपन्न करीत ते अभ्यासणे.

४. तत्कालीन मंदिरे रोषणाईचा अभ्यास.

५. भजन,कीर्तन,प्रवचन,पोवाडे या सांस्कृतीक कार्यक्रमाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

६. तासगांव संस्थानाचा राजकर्ते पेशवे म्हणजे पुणे दरबारी कसा वेगळा प्रभाव पडल याचा अभ्यास करणे.

७. शहरातील वाडे, मंदिराचा, बांधकाम व स्थापत्त्य शैलीचा अभ्यास करणे.

८. परशुरामभाऊ पटवर्धनांनी तासगांवचे नाव स्वराज्याच्या नकाशावर कसे प्रतिबिंबीत केले याचा अभ्यास करणे.

९. संस्थान विकासासाठी अमलात आणलेल्या योजनांचा अभ्यास करणे.

१०. शहरातील सावकरांचा सामाजिक,शेती, उद्योग, विषयक सकारात्मक दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

वरील उदिष्टांच्या दिशेने संदर्भ साधनाचा अभ्यास करून तत्कालीन दक्षिणेतील मातब्बर सरदार परशुराम भाऊ पटवर्धन हे केवळ योध्देच नव्हते तर समाजाच्या कल्याणासाठी, संस्थानिक प्रजेच्या प्रगतीसाठी रयतेची काळजी घेणारा समाजातल्या सर्वस्तरांना पाठबळ देणारा सेनापती होते. ही बाब ऐतिहासिक दस्तऐवजाच्या साहायाने प्रकाशात आणणे यासाठी सदरचा प्रोजेक्ट मी हाती घेतला आहे.

# - संशोधन साहित्य व संशोधन पध्दती -

हा मायनर रिसर्च प्रोजेक्ट प्रामुख्याने प्रकाशित,अप्रकाशित, मुलाखतीच्या तंत्राचा वापर करून तसेच भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, पेशवे दप्तर, विविध लेखकांनी केलेले ऐतिहासिक लेखन वासुदेवशास्त्री खरे यांची ऐतिहासिक कागदपत्रे, करवीर रियासत सर परशुराम भाऊपटवर्धन यांची स्मरणिका प्रतिवर्षी तासगांवच्या रथोत्सवावर निघणाऱ्या वृत्तपत्रांच्या पुरवण्यांचा वापर प्रामुख्याने केला आहे. त्याचबरोबर वि.का. राजवाडे. यांनी संपादित केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने यातील काहीचा वापर केला जात आहे. तसेच परशुराम भाऊ पटवर्धन यांचे वशंज राजेंद्र पटवर्धन यांची प्रदिर्घ मुलाखत त्यानीं प्रकाशीत केलेले साहित्य, त्यांच्या हस्तलिखीत लेख वापरण्यात आले आहेत.

सदर प्रोजेक्ट अधिकाधिक परिपूर्ण व्हावा यासाठी तासगांव शहाराच्या सामाजिक, आर्थिक, व राजकीय इतिहास एक ऐतिहासिक अभ्यास हा भारती पवार यांचा पी.एच. डी. प्रबंध तसेच The Patwardhans of Tasgaon Miss Sankpal S. D. यांचा एम.फीलचा प्रबंध संदर्भसाधन म्हणूनही अभ्यासला आहे. याशिवाय तुळपुळे, शं.गो, वि.वा कुलकर्णी. महाराष्ट्र राज्य गॅझिटीअर कोल्हापूर, सांगली जिल्हा ना.सि. दिक्षीत. मराठ्यांच्या इतिहास अ.य.कुलकर्णी यांच्या मराठ्यांच्या इतिहास खंड—२ यांच्या वापर केला आहे. याशिवाय मी स्वत: वृत्तपत्रात ऐतिहासिक लेखन करित असल्यामुळे पटवर्धनांच्या बाबतित लिहिलेले लेख वापरले आहेत. विशेषता विश्वकोष खंड—९, १० चा ही वापर केला आहे.

## प्राथमिक साधने-

१. तासगांवचा ताम्रपट

२. राजवाडा

३. गणपती मंदिर

४. तत्कालीन स्थापत्यशैली,राजवाडयातील चित्रांचे अवलोकन केले आहे.

## प्रकरण नियोजन :-

| अ.नं. | नियोजित विषय |
|---|---|
| १ | विषयाची पार्श्वभूमी. मराठी सत्तेचा उदय, विकास |
| २ | तासगांवची ऐतिहासिक पार्श्वभूमी |
| ३ | तासगांव नावाची उत्पत्ती |
| ४ | पटवर्धन घराणे |
| ५ | परशुरामभाऊ पटवर्धनांचा धार्मिक व सामाजिक दृष्टीकोन |
| ६ | प्रोजेक्टचा इतर विषयाशी संबंध |
| ७ | प्रोजेक्टचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील महत्व |
| ८ | प्रोजेक्टची उद्दिष्टे |
| ९ | संशोधन साहित्य व संशोधन पध्दती |
| १० | संदर्भ सूची |

# - संदर्भसूची -


१. तुळपुळे शं.गो. संपादक— सागर प्रकाशन कोल्हापूर प्राचीन मराठी कोरीव लेख पृष्ठ क्र. १३५

२. प्रा.वि.वि.कुलकर्णी — विद्याप्रकाशन नागपूर— मध्ययूगीन भारताचा इतिहास पृष्ठ.क्र.५९

३. प्रा.वि.वि.कुलकर्णी — विद्याप्रकाशन नागपूर कित्ता—२— मध्ययुगीन भारताचा इतिहास पृष्ठ क्र. ५९

४. प्रा. एन.ए.शिंदे. प्रा.थोरात,प्रा.गायकवाड—शिवाजी आणि शिवयुग— पृष्ठ क्र. १२०

५. प्रा.एन.डी.पाटील,थाटोत,पवार,अभय पाटील— मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास — पृष्ठ २९

६. डॉ. सी.जी. पाटील.— तासगांव तालुक्यचा द्राक्षशेतीचा आर्थिक इतिहास पी.एच.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २००७ — पृष्ठ क्र. ९

७. राजेंद्र पटवर्धन— मनासारखा राजा आणि राजासारख मन लेखामधुन — पृष्ठ क्र.— २

८. राजेंद्र विठ्ठल कोळेकर— विठ्ठल मंदीर ट्रस्टी— मुलाखत

९. कै.कृष्णा रावजी पाटील माजी मुख्याध्यापक — मुलाखत

१०. कित्ता दोन — पान—९ डॉ.सी.जी.पाटील प्रबंध

११. राजेंद्र पटवर्धन — कित्ता दोन. पान १ वरून

१२. रामचंद्र अनंत लागू— बायोग्राफी ऑफ गोपाल गोविंद पटवर्धन—पृष्ठ.— ५

१३. रामचंद्र अनंत लागू —महाराष्ट्राची इभ्रत किंवा पटवर्धनांचे पराक्रम पृष्ठ क्र. — ७

१४. प्रा. वल्लभदास शेळके.— दै. अग्रदूत १७.९.२००८ — श्रीमंत परशुराम पटवर्धन तासगांवकर पान.क्र— ३

१५. स.मा. गर्गे करवीर रियासत पृष्ठ—३०४

१६. तरूण भारत २६ ऑगस्ट २०१७ सांगली पान.क्र —२. प्रा. जी.के. पाटील.

१७. राजेंद्र पटवर्धन— मुलाखत

# प्रकरण -२

## तासगांवचा इतिहास व पटवर्धन घराणे

१. तासगांव पूर्व इतिहासाच्या पाऊलखुणा व पटवर्धन घराणे

२. भौगोलिक परिस्थिती

३. हवामान

४. पर्यटन स्थळे

५. पटवर्धनांना सत्ताप्राप्ती —

पटवर्धन घराण्याची माहिती

६. वारभाई कारस्थान व परशुराम भाऊ पटवर्धन

७. श्रीमंत परशुराम भाऊ व रघुनाथराव राघोबा संघर्ष

८. संदर्भ सूची.

# प्रकरण -२

## तासगांवपूर्व इतिहासाच्या पाऊलखुणा व पटवर्धन घराणे

सांगली जिल्हयातील अनेक शहरांना आणि गावांना प्राचीन इतिहास आहे. किमान दोन हजार वर्षापूर्वीच्या पाऊलखुणा काही गावात आढळतात.सुमारे हजार वर्षापूर्वी मोठा नाव लौकीक असलेली गावे किंवा शहरे होती. त्यात तासगांव, भाळवणी, औंदुंबर, जत, कुडाळ, वाळवा या गावांचा समावेश होतो. मध्ययुगीन व आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात नेहमीच भूषणावह ठरलेले गाव म्हणजे तासगांव. बाराव्या शतकात देवागिरीच्या यादवांची येथे सत्ता होती.[१] यानंतर १३४७ मध्ये बहामनी राज्याची कर्नाटक प्रांतातील गुलबर्गा येथे हसनगंगू बहामनी यांनी सत्तेची स्थापना केली. या बहामनी राजवटीने महाराष्ट्रावर काही काळ आपले राजकीय प्रभुत्व लष्करी कौशल्याच्या जोरावर प्रस्थापित केले त्यावेळी तासगांव त्यांच्या ताब्यात होते १५५२ ला बहामनी राज्यात अंतर्गत सत्ता संघर्ष होऊन जी पाच शतके पडली त्यातील विजापूराच्या आदिलशाही इतिहासात तासगांव समाविष्ट झाले.[२] १७ व्या शतकात छ.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर प्रतापगडाच्या पायथ्याशी १० नोहेंबर १६५९ ला विजापूरचा आदिलशाही सरदार अफजलखानास ठार केले. व हिंदवी स्वराज्याच्या विस्तारासाठी दक्षिण मोहिमा सुरू केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी वडूज, खटाव, मायणी मार्गे तासगांव अशी मिरजेच्या किल्ल्यावर स्वारी केली त्यावेळी सदरच्या इलाखा छत्रपतींच्या स्वराज्यात सामील झाला.[३] छत्रपतींच्या मृत्युनंतर संभाजीराजे १६जानेवारी १६८० ला सत्तेवर आले त्यांनी नऊ वर्षे मोगलांशी निकराने लढा दिला. पण मराठ्यांच्या दुर्दैवाने १ फेब्रुवारी १६८९ ला संगमनेर मुक्कामी शेख निजामाने संभाजी आणि कवि कलश यांना पकडुन औरंगजेबाच्या स्वाधीन केले. ११ मार्च १६८९ ला संभाजी राजांना बादशहाने ठार केले[४] आणि मराठी राज्याला नव्या राजकीय संघर्षाला सामोरे जावे लागले. रायगड मोगलांच्या

ताब्यात गेला राजाराम महाराजांनी जिंजीस जाऊन १७०० अखेर संघर्ष केला. राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर महाराणी ताराबाईने मोगलांशी १७०७ अखेर संघर्ष केला त्याला ''मराठ्यांचे स्वातंत्र युध्द म्हणतात.'' या काळात २० फेब्रुवारी १७०७ ला औरंगजेब बादशहा मृत्यु पावला. आणि दिल्लीचे तक्त मिळविण्यासाठी त्यांचे पुत्र आजमशहा व शहाआलम यांच्या संघर्ष सुरू झाला असता. दक्षिणेतील  मराठयांशी चालु असलेला संघर्ष संपवून तो दिल्लीच्या रोखाने जात असता झुल्फिकारखानाने आज्जमशहास सुचविले की, आपल्या कैदेतुन संभाजी पुत्र  शाहुची आपण सुटका करावी म्हणजे आपोआपच मराठी राज्यात यादवी युध्द होईल तेव्हा बादशहाने ८ मे १७०७ ला शाहूंशी करार करून सुटका केली.[५] त्यामुळे शाहू व ताराबाई यांच्यात खेडची लढाई झाली त्यात शाहूचा विजय झाला. पण मराठ्यांचा सातारा व कोल्हापूर अशा दोन गाद्या तयार झाल्या.

साताराच्या शाहू राजांना बाळाजी विश्वनाथासारखा कर्तबगार पेशवा मिळाला आणि बाळाजी विश्वनाथाच्या घरालाही वंशपरंपरागत पेशवाई मिळाली. सातारचे छ.शाहू यांचे १७४९ ला निधन झाले आणि मराठी सत्तेच्या कारभाराचे केंद्र सातारहून पुणे प्रांती गेले. पहिल्या बाजीरावास शाहूंनी हा प्रांत जहागीर म्हणून दिला होता. बाजीरावाने आता शनिवार वाड्यातुन मराठा राज्यकारभार करण्यास सुरूवात केली.बाळाजी विश्वनाथ आणि पटवर्धन घराण्याचा मुळ पुरूष हरभट पटवर्धन हे दोघेही कोकणातील बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनचे तर हरभट पटवर्धन कोतवडेचे पण यांचा संबंध आला तो कापशीकर घोरपडेंच त्यातून पेशव्यांनी हरभट पटवर्धनांच्या सहाही मुलांना मराठी सत्तेच्या विस्तार कार्यात समाविष्ट करून घेतले. याचे कारण कापशीकर घोरपडेंचे मंत्री नारायण महादेव जोशी यांचा मुलगा व्यंकटराव व बाळाजी विश्वनाथाची कन्या अनुबाई यांचा विवाह हरभट पटवर्धनांच्या मध्यस्थीने झाल्याने पटवर्धन घराणे उत्कर्षास पोहचले.[६]

उत्तरेत शिंदे,होळकर,गायकवाड,पवार यांनी आपल्या पराक्रमाने मराठी राज्य वाढविले स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले तसे दक्षिणेत मराठी राज्याचा विस्तार करण्यात घोरपडे,देसाई,आणि पटवर्धन हे सरदार कारणीभूत आहे. पटवर्धन घराण्यातील कर्तबगार पुत्रांना कुरूंदवाड, मिरज, सांगली, जमखंडी तासगांव येथे जहागिरी देण्यात आल्या. या घराण्यातील परशुरामभाऊ सारखा एक मोठा योध्दा, प्रशासक, लोकहिततत्पर, सेनानी होऊन गेली.[७] (१७४०—१७९९) तासगांव या जहागिरीतून त्यांनी उत्तर पेशवाईच्या काळात म्हणजेच मराठ्यांचे पानिपताच्या पराभवानंतर मराठी सत्तेला लागलेला कलंक दक्षिण मोहीम यशस्वी करून धुऊन काढला. त्यांनी आपल्या आयुष्यात ६० वर्षात १०० लढाया केल्या. ते जसे योध्दे होते तशी त्यांनी समाजिक, धार्मीक, आर्थिक विकासाची दृष्टी होती त्यांनी आपल्या संस्थानाची केलेली चौफेर प्रगती व गणपती मंदीरातील व अन्य मंदीराच्या स्थापना करून धार्मिकतेतून निर्माण केलेला सामाजिक सलोखा अभ्यासावा या हेतूने हा प्रबंध लिहला असून भौगोलिक स्थिती शहरातील ऐतिहासिक वास्तु यांचाही आढावा घ्यावा लागेल.

१. भौगोलिक परिस्थीती—

मराठी राज्याच्या स्थापनेपासून स्वातंत्र्योत्तर भारताच्या आजपर्यंतच्या इतिहासाचा अभ्यास केला तर तासगांव हे महाराष्ट्राच्या नकाशावर इथल्या कर्तबगार पुरूषांच्या पराक्रमावर, बुध्दीमतेवर, कर्तृत्वावर दृष्टीशाली नेतृत्वामुळे सदैव अग्रेसर राहिलेले आहे. या यशोगाथेचा पाया आहे सर परशुराम भाऊ पटवर्धन. सांगली जिल्हयाच्या पूर्वेस तासगांव तालुका असून उत्तरेकडे १६° — ४५’ ते १७° —१५’ अक्षांश व पूर्वेकडे ७४° — २२’ ते ७४° — ५५’ रेखांश यामध्ये येतो पूर्वेस कवठेमहांकाळ सध्या हा तालुका तासगांव मतदार संघात समाविष्ट आहे. पश्चिमेस वाळवा दक्षिणेस मिरज आणि उत्तरेत खानापूर तालूके आहे.

## तासगांवचे स्थान -

तासगांव शहर मध्यसमुद्र सपाटी पासून उंची ५७० मीटर १८३७ फूट समांतर रेषेत असून ते उत्तरेकडे १७° — २' ते १७° — ५' अक्षांश व पूर्वेकडे ७४° — ३५' ते १७४° — ३७' रेखांश मध्ये वसले आहे.[८] पूर्वी तासगांव हे शहर दक्षिण सातारा जिल्हयातील एक तालुक्याचे ठिकाण होते. शेती हा या भागातील लोकांचा प्रमुख उद्योग होता तत्कालीन संस्थानिकांचे आर्थिक स्तोत्र म्हणजे शेती आणि शेती उत्पन्नावर आधारीत असलेले छोटे घरगुती स्वरूपाचे उद्योग होत. परशुरामभाऊंच्या पूर्वी हा इलाखा आदिलशाही, कोल्हापूर यांचेकडे होता. पण फारसा विकसित नव्हता भाऊंनी या शहराला वैभव दिले त्या काळचे अनेक अवशेष आजही आढळतात.

या शहराच्या पश्चिमेला येरळा नदी असून पटवर्धन काळात साधारणत: ती नऊ महिने प्रवाहीत होती आज ती आर.आर.आबा पाटील यांच्या प्रयत्नांने बारमाही झाली आहे. तर नैऋत्येकडे कापूर ओढा असून सर परशूरामभाऊ पटवर्धनांना त्या ओढ्यात हत्तींना पाणी पिण्यासाठी व लोकांना स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा म्हणून दगडी कुंड बांधले होते.[९]

## हवामान-

तासगांव परगाण्याचे दोन भाग पडतात. त्यातील पश्चिम भागाला कृष्णा नदीच्या व येरळेच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी काही प्रमाणात पाट काढून व विहिरीद्वारे होत असे सध्या आरफळ, ताकारी कॅनाल आहेत. तर पूर्व भाग अवर्षण प्रवण असून निसर्गाच्या लहरीवर येथे लोकांना रहावे लागते कारण सह्याद्री पर्वताची रांग तासगावच्या पूर्वेला ८० किलोमीटर लांब असल्याने पर्जन्यावर त्याचा परिणाम होतो.[१०] जून ते ऑक्टोबर पर्यंत पाऊस कमी अधिक पडतो किंबहूना दुष्काळ सदृश्य परिस्थितीशी निर्माण होते. आक्टोबर ते जानेवारी हिवाळा, जानेवारी ते मे अखेर उन्हाळा, आणि जून ते ऑक्टोबर अखेर पावसाळा

असे तीन ऋतू लोकांस अनुभवायास मिळतात. तासगांव भाग समशितोळा कटिबंधात येत असल्याने मध्यम पाऊस उत्तम थंडी आणि बऱ्यापैकी उन्हाळा येथे असल्याने उन्हाळ्याचा त्रास लोकांस फार होत नाही.[११]

## पर्यटन स्थळे

सर परशुराम भाऊ पटवर्धन हे जसे पराक्रमी होते तसे ते अध्यात्मवादी होते. संगिताची त्यांना आवड होती. किंबहुना ते संगितात निष्णात होते. त्यांच्या काळात संस्थानात जी मंदिरे होती त्यांच्या जीर्णोध्दार केला व काही नवीन मंदिरे बांधली तीच लोकांची आज ऐतिहासिक कालीन धार्मिकस्थळे पर्यटन स्थळे बनत आहेत. सांगली जिल्ह्यात अनेक देवस्थाने प्रसिध्द आहेत ती चांगली पर्यटन स्थळे आहेत. तासगांव सांगली येथील गणपती मंदिरे श्रध्दास्थाने आहेत.[१२]

तासगांव संस्थानातील हटकेश्वर मंदिर हे पटवर्धनांना अगोदर असले तरी त्याच्या आणि सिध्देश्वर मंदिराचा जीर्णोध्दार करून पटवर्धनांनी या देवस्थानाला जमिनी इनाम दिल्या.

क्षेत्र औदुंबर येथे कृष्णा नदीवर घाट बांधला काशी विश्वेश्वर मंदिराची निर्मिती केली. त्याच्या इलाख्याला लागून शुकाचार्य, खरसुंडी मंदिर, होनाई मंदिर ही ऐतिहासीक धार्मीक स्थळे म्हणून उदयास आली.

## मराठ्यांचे सेनाकर्ते म्हणून सर परशुराम भाऊ पटवर्धन-

तासगांवच्या पटवर्धन संस्थानाचा अभ्यास करताना असे दृष्टोपतीस येते की, तासगावचा इतिहास राष्ट्रकुट, शिलाहार, चालुक्य त्याच बरोबर १२ व्या शतकातील राजा रामदेव राय नंतर हसनगंगूबहामनीचा वजीर महम्मद वान याचा १५२६ ला मृत्यु झाल्या नंतर हा प्रदेश आदिलशाही राज्यात गोळा तासगांव येथे आदिलशहाच्या वतीने धुळगावचे डुबल सरकार तासगांव मधील राजवाड्यात रहात होते असा उल्लेख आढळतो.[१३]

मराठी सत्तेच्या सातारा आणि कोल्हापूर अशा दोन गाद्या तयार झाल्यानंतर तासगांव परगणा कोल्हापूरच्या संभाजीकडे गेला तेंव्हा कोल्हापुरच्या संभाजीराजांनी डुबल सरकार यांनाच नेमणूक दिली. १७३१ ला वारणेच्या तहानंतर मिरज प्रांत, विजापुर प्रांतातील ठाणी देखिल अथणी तासगांव सातारकर शाहू महाराजांना स्वाधीन करण्यात आले.

शाहू मराजांनी बाळाजी विश्वनाथ यांना खेडच्या विजयानंतर वंशपरंपरागत पेशवेपद दिले. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतच पटवर्धन घराण्याचे मुळ पुरूष हरभटबाबा पटवर्धन यांचा संबंध आला. नानासाहेब पेशव्यांच्या काळात हरभट पटवर्धन घराण्यातील सर्वांना मराठी राज्याची सेवा करण्याची संधी मिळाली.

नानासाहेब पेशव्यांनी १७४८ साली जी शेवटची उत्तर मोहीम काढली त्या स्वारीतुन परत येत असताना नानासाहेबांनी रामचंद्र हरींना आपल्या भरवशाचा सरदार म्हणून उत्तरेत शिंदे, होळकरांच्या बरोबर ठेवले. उत्तरेत असताना १७४९ मध्ये पोटाचा आजार होऊन रामचंद्र हरी मृत्यु पावले. ब्रम्हावर्तानजिक शिवराजपूर येथे.[१४] त्यानंतर  त्याचा सरंजाम परशुरामभाऊंच्या सरंजामाशी जोडण्यात आला २४०० रूपये इतका. पटवर्धनांच्या फौजेला १७६१ पर्यंत पेशवेसरकारातुन नक्त रोजमुरा मिळत असे त्याऐवजी पथकाच्या खर्चासाठी कायमचा सरंजाम मिळावा अशी पटवर्धनांनी मागणी केल्याने माधवराव पेशव्यांनी १७६२ मध्ये २५ लाख रू. सरंजाम लावून दिला. त्या सरंजामाची कागदपत्रे १७६४ ला पूर्ण करण्यात आले. गोविंद हरी परशुराम रामचंद्र आणि निळकंठ त्रिंबक या पटवर्धन घराण्यातील तिघांची नावे सरंजामाच्या कागदपत्रावर आहेत. त्यावेळी ते सर्वजण एकत्र रहात १७७४ मध्ये श्रीमंत नारायण बळ्लाळ पेशवे यांनी वरील तिघांना सरदारकीच्या सनदा दिल्या. व मराठ्यांचे दक्षिणेतील सेनाकर्ते म्हणून परशुराम भाऊंचा अनेक युध्दातील विजयाने उदय व दरारा निर्माण झला. सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत मराठी राज्याची जी भरभराट झाली. त्याचे श्रेय परशुरामभाऊ पटवर्धनांना द्यावे  लागेल त्यानी आपल्या पराक्रमाने तासगांव

संस्थानाचे नाव सर्वोतोमुखी केले. आज मराठा कालीन ऐतिहसिक कागदपत्रात तासगांवचा जो लौकिक झाला आहे. त्याचे कारण मराठ्यांचे सेनाकर्ते सर परशुरामभाऊ पटवर्धन होत.

## सर परशुरामभाऊ पटवर्धन तासगांव संस्थानाचे अधिपती [१५]

हरभटबाबा पटवर्धन – रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवड (१७४० – १८००)

↓

कृष्ण | बाळ | रामचंद्र | त्रिंबक | गोविंद | माधव | भास्कर

रामचंद्र

↓

वसई मोहिमेत पराक्रम

↓

परशुरामभाऊ पटवर्धन

↓

रामचंद्र

↓

बापूसाहेब

↓

गणपतराव

↓

विनायकराव

↓

परशुराम विनायक | श्री मंगलमूर्ती विनायक

परशुराम विनायक → राजेंद्र पटवर्धन, प्रदीप

राजेंद्र पटवर्धन → कै.निरंजन पटवर्धन

श्री मंगलमूर्ती विनायक → कुमारश्री मंगलमूर्ती → निखील

यापैकी माधवचा मृत्यु अकाली लहानपणी झाला.
हरिभटबाबांना अनुबाई एक मुलगी होती.

पेशवाईतील एक अत्यंत कर्तबगार व निष्ठावंत घराणे हे मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवड गावचे. या घराण्याचा मुळ पुरूष हरिभट पटवर्धन त्यांना एकूण सात पुत्र कृष्ण, बाळ, त्रिंबक, गोविंद, रामचंद्र, माधव, भास्कर व अनुबाई नावाची एक मुलगी होती. हरिभट यांचा कालावधी १६५५ ते १७५० असून ते गाव सोडून बहिरेवाडी येथे आले. तेथे त्यांचा इचलकरंजीकर घराण्याचे संस्थापक नारो महादेव जोशी यांच्याशी कुलोपाच्याया म्हणून संबंध आला. इचलकरंजीकर व पेशवे यांचे विवाह संबंधाचे नाते होते. त्यामुळे त्यांचा बालाजी विश्वनाथाशी संबंध आला. गोविंदराव इंद्रोजीच्या मृत्युनंतर पेशव्यांनी त्यास त्यांच्या सैन्याचे अधिपत्य दिले अशा रितीने पटवर्धनांनी मराठी राज्याच्या सेवेस सुरूवात केली.

हरभटबाबांच्या सहा पुत्रांपैकी रामचंद्रपंत म्हणजे परशुराम भाऊ पटवर्धन यांचे वडील तलवारबाजी अश्वारोहण व मर्दुमकीत निपुण होते. थोरले बाजीराव पेशवे यांचे धाकटे बंधु श्रीमंत चिमाजी आप्पा यांना लढयामध्ये नेहमी साथ व सहकार्य असे रामचंद्रपंतांना पुणे मुक्कामी शके १६६२ श्रावण शुक्ल ८ रोजी म्हणजे सन १७४० ला जे पुत्र रत्न झाले तेच तासगांव संस्थानाचे अधिपती परशुरामभाऊ पटवर्धन होत. भाऊंना पित्यास सहवास फार काळ लाभला नाही. एका मोहिमेवरून परत येत असताना १७४६ ला पोटाच्या आजाराने रामचंद्रपंत मृत्यू पावले. विशेष म्हणजे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांनी १७४० बाजीरावाचा मृत्यू झाल्यानंतर हरभटबाबांच्या सहाही चिरंजीवांना पुण्यात अश्वशाळा, शस्त्रागार, हिशोब लेखन, मोहिमांची योजना, पत्रव्यवहार इ. वेगवेगळ्या कामावर नेमले होते.[१६]

रामचंद्रपंतांचा मृत्यू झाला त्यावेळी परशुरामभाऊ अत्यंत लहान होते. माता जानकीबाईंना अतिशय दु:ख झाले. पण त्या अतिशय निर्धारपूर्वक परशुरामभाऊंना घडवू लागल्या. जानकीबाई या पुण्यातील खाजगीवाले लिमये या घराण्यातील होत्या. आपल्या घराण्याच्या परंपरेला योग्य असे शिक्षण

जानकीबाईंनी देण्यास सुरूवात केली. युध्दकलेचे शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांनी पुतणे पुरूषोत्तम दाजी यांच्यावर टाकली. हे त्यावेळी पेशव्यांच्याकडे सैनीकांना प्रशिक्षण देण्याचे काम करीत होते. त्यांनी परशुरामभाऊंना घोड्यावर बसणे, तिरंदाजी, तलवारबाजी, गनिमी कावा यांचे प्रशिक्षण दिले. परशुराम भाऊ विषयी हरिवंशाच्या बखरीत श्वानि प्रमाणे कौतुक केले आहे.

रामचंद्र आप्पास पुत्र परशुरामभाऊ झाले. [१७]

ते साक्षात परशुराम अवतार झाला.

वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी १७५४ साली जी कर्नाटक मोहिम हाती घेतली होती त्या युध्दात अद्वितीय पराक्रम करून परशुराम भाऊंनी सावनुरकरांचा पराभव केला. भाऊंच्या समवेत त्यांचे चुलत बंधू पुरूषोत्तम दाजीही होते. तेव्हा श्रीमंतांनी अतिशय खुष होऊन कोरेगांव बक्षिस दिला व त्याबद्दल सुस्तन खमत खमसेन माया व आलफ छ १२ रूबिलाखरची पुत्र पौत्रोदी वंशपरंपरेची सनद १७५४ ला करून दिली. यानंतर हैदर टिपू निजाम, कोल्हापूरकर, सातारचे राजे व इंग्रजांशी झालेल्या लढय्यात भाऊ विजयी. १७६५ पर्यंत पटवर्धन सरदारांच्या कडे २५४१९०० रूपयाचा मुलुख होता.[१९] श्रीमंत नारायणराव पेशवे यांनी वामन गोविंद, परशुराम रामचंद्र व रघुनाथ निळकंठ या तिघांच्या नांवे सरदारकीच्या सनदा बेहडा करून दिल्या तो येणेप्रमाणे –

(सूरसन शितेन मयातेन व आलफ आरवा सबैन मयातैन व आलफच्या तैनांत जाबत्या प्रमाणे) फौजा नौबतखाना स्वार देखील २४,००,००० रू पाया व शिबंदी सुध्दा दर रावती सरासरी ३०० रू प्रमाणे ८००० स्वारांचे, जातीच्या तैनाती ८८१०० रूपये शिबंदीबद्दल सरंजामाचे शिरस्ते पाहून ७०,००० रूपये, एकूण पंचवीस लक्ष अठ्ठावन हजार एकशेचा सरंजाम नेमून देऊन त्रिवर्गाचे नांवे नवी सनद करून दिली. यावेळी हे सरदार आपआपल्या सोईप्रमाणे मिरज, तासगांव व कुरूंदवाड येथे राहत असत.[२०]

ब्रिटीश सेनापती लॉर्ड वेलस्लीने भाऊंच्या बद्दल 'सर्वात भरवशाचा मराठा सरदार'[२१] असे उद्गार काढले. राजानिष्ठचा मेरूमणी वाकबगार युध्दतज्ञ असणाऱ्या भाऊंना १५०० खडे सैन्य ठेवण्याचे व पुणे दरबारी हाक येताच आणखी फौज उभरून स्वामीच्या हुकूमाला तत्काळ प्रतिसाद देण्याचा आदेश होता. यात भाऊंनी एकदाही कसूर केली नाही. हैदर, टिपू, निजाम, इंग्रज, फ्रेंच व इतर सरदारात आपआपसात सत्ता संघर्ष चालत असताना पेशवे सरकारला त्यांनी अथपासून इतिपर्यंत साथ दिली आणि सातारा छत्रपतींच्या वतीनेच अधिकार वापरले व संस्थानाचा कारभार केला. दक्षिण महाराष्ट्रात मराठी राज्याची निष्ठावान संरक्षण भिंतच जणू भाऊंनी कारभार करून निर्माण केली. १७७० ते १७९९ अशी तीस वर्षे सरदार सेनाकर्ते म्हणून सन्मात मिळवला.

१८ नोव्हेबर १७७२ ला माधवरावाच्या मृत्युनंतर पेशवाई प्रचंड गोंधळ निर्माण झाला त्यामुळे मराठा राज्यात पोकळी निर्माण झाली. या संदर्भात ग्रॅट डफ म्हणतो (The plains of panipat were not more fatal to the Maratha Empire than the early end of this excellent Prince - Grant Duff)[२२]

पानिपतच्या संकटामुळे मराठा राज्याचे जे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक पटीने माधवरावाच्या अकाली मृत्युने झाले. त्यानंतर त्यांचा धाकटा भाऊ नारायणराव यांना १३ डिसेंबर १७७२ ला वयाच्या १७ व्या वर्षी पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली त्यावेळी माधवरावांनी आपल्या मृत्युपत्रात नारायणरावाच्या नावाने पेशवाईची वस्त्रे आणावीत व सखारामबापू व नाना फडणीस यांनी राज्य कारभार करावा असे सुचित केले.

## वारभाई कारस्थान व परशुरामभाऊ पटवर्धन -

माधवरावाच्या मृत्युनंतर आपणांस पेशवे पद मिळाले नाही ही खंत रघुनाथरावांना अस्वस्थ करू लागली. त्यातून जी रघुनाथरावांच्या पुढाकाराने अनेक कारस्थाने होऊन ३० ऑगस्ट १७७३ ला नारायणरावांचा खून झाला. रघुनाथरावाने पेशवेपदाच्या प्राप्तीसाठी केलेला कट मराठे शाहीतील मातब्बर मुत्सद्यांना आवडला नाही त्यातून त्यांनी रघुनाथरावाला सत्तेपासून दूर ठेवण्याची योजना आखली. याच काळात सखारामबापूंना माहिती मिळाली की नारायणरावांची पत्नी गंगाबाई गरोदर आहे. तेंव्हा कोणत्याही परिस्थितीत रघुनाथरावाला सत्तेवर येऊ द्यावयाचे नाही.

सखारामबापूंनी नारायणरावाच्या मृत्युनंतर १० व्या दिवशी योजना मांडली की, गंगाबाईस मुलगा झाला तर पेशव्यांचा गादीला कायदेशीर वारस मिळून प्रश्न आपोआप सुटेल. जर मुलगी झाली तर अलीबहादूरच्या नावाचा विचार करता येईल. तो बाजीरावाच्या मस्तानीचा मुलगा समशेर बहादूरचा मुलगा होय. या योजनेत महत्त्वाची व्यक्ती नाना फडणीस होती. तर निजाम दरबारात दूत कृष्णराव काळे या योजनेचा समर्थक होता. सखाराम बापूंनी या योजनेत बारा लोकांना समाविष्ठ करून घेतले. त्यातील एक परशुरामभाऊ पटवर्धन होत.[२३]

## श्रीमंत परशुरामभाऊ व रघुनाथराव (राघेबादादा बंडवाले पेशवे) एक संघर्ष

नारायणराव पेशव्यांच्या हत्येच्या आणि मराठ्यांच्यात निर्माण झालेल्या दुहीचा फायदा निजाम आणि हैदर यांच्यासारखे जबर व मातब्बर शत्रू घेतल्याशिवाय राहणे शक्य नव्हते. त्यांनी दक्षिणेतील पेशव्यांची अनेक ठाणी हल्ले करून उध्वस्त केली त्यामुळे नाईलाने निजाम व हैदर यांचा मुकाबला करण्यासाठी राघोबाला दक्षिणेकडे मोहिम सुरू करणे भाग पडले.

नारायणराव पेशवे व त्यांच्या रक्षकांचे रक्त सांडून गिळंकृत केलेल्या पेशवाईने राघोबाला एक दिवसही सत्तास्थान पुणे येथील शनिवारवाड्यात आरामात उपभोगून दिले नाही.[२४]

राघोबा जसे मोहिमेवर गेले तशी त्यांच्या मागे नाना फडणीसांनी पुढे 'बारभाईचे कारस्थान' या विशेषाने गाजलेले कारस्थान केले. त्यान्वये राघोबाला पेशवा म्हणून पदच्युत करून नारायणरावाची गरोदर पत्नी गंगाबाई हिला बंदोबस्तात पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेवले. तसेच तिच्या नावाने हरिपंत (तात्या) फडके, सखाराम बापू बोकील व नाना फडणीस कारभार पाहू लागले.

इकडे परशुरामभाऊ पटवर्धनांच्यावर एक बिकट धर्मसंकट उपस्थित झाले. एकाच वेळी नाना (गंगाबाई पेशवे मार्फत) व रघुनाथराव (राघोबा) ''दादासाहेब'' पेशवे यांची फर्माने येऊन धडकली की,

''तुम्ही आपल्या पूर्ण सेना सरंजामासहित आमचेकडे निघून या''

दादासाहेबाला पुण्याच्या कारस्थानाची सुतराम कल्पना नसल्यामुळे कर्नाटकातील मोहिमेत भाऊंची मदत असावी म्हणून त्यांना कर्नाटकात बोलावले. इकडे पुण्यातील रचलेले कारस्थान पूर्ण यशप्राप्त जावे म्हणून नानांनी (फडणीस) भाऊंची मदत मागितली.

परशुरामभाऊ वरील हा प्रसंग वाका होता कारण पेशवा दादासाहेब विरूध्द उघड उभे राहण्याऐवढी परिस्थिती स्पष्ट नव्हती. म्हणून अफाट बुध्दीमत्तेच्या भाऊंनी श्रीमंत सरकार पेशव्यांची आज्ञा अव्हेरली असा दोषारोप होऊ नये म्हणून

राघोबादादाच्या मदतीसाठी कर्नाटकचा रस्ता पकडला. परंतु त्याच बरोबर नाना फडणीसांची खप्पा मर्जी होऊ नये म्हणून व श्रीकृपेने गंगाबाईंना पुत्र रत्न होऊन वारभाईचे कारस्थान यशस्वी झाले तर ''नूतनजात पेशव्याच्या संरक्षणार्थ पटवर्धनांची तलवार हजर पाहिजेच'' या उदात हेतूने भाऊंनी त्यांचे अत्यंत विश्वासू व निष्ठावंत चुलत बंधू पुरूषोत्तम (दाजी) पटवर्धन यांना पुरंदर किल्ल्यावर पेशव्यांच्या कायदेशीर वारसाच्या रक्षणासाठी रवाना केले.[२५]

'रघुनाथ (राघोबा) बाजीराव' यास बंडवाला घोषित केले व त्याचा विमोड करण्यासाठी नानांनी हरिपंत (तात्या) फडके यांना ४०००० फौज देऊन पाठवून दिले. या सर्वांचा भाऊंना आनंद झाला व लगेच राघोबाचा पक्ष झुगारून देऊन त्यांच्यावर द्वेषाने चालुन गेले. तात्या व भाऊ यांनी राघोबादादांचा पिच्छा पुरवून त्याला 'त्राहि भगवन' करून सोडले. जवळ जवळ संपूर्ण मध्य भारतभर 'राघोधिंड' निघाली.

दरम्यानच्या काळात पुरंदर येथे १८ एप्रिल १७७४ ला गंगाबाईला मुला झाला त्याचे नांव सवाई माधवराव ठेवण्यात आले. त्या लहान मुलाला पाहून भाऊ उद्गारले ''श्रीमंतांची लिला काय लिहावी? केवळ ईश्वरी स्वरूप आहेत''. २८ मे १७७४ ला ४० व्या दिवशी सवाई माधवरावाच्या नावाने पेशवाईची वस्त्रे आणण्यात आली.[२६] व बारभाई कारस्थान यशस्वी झाले. त्यांनी राघोबांशी संघर्ष न करता तडजोड करावयाचे ठरविले. सुरूवातील यश आले नाही.

राघोबाने पटवर्धनांचे मुख्य शहर मिरजेवर हल्ला केला. १७७३ तेव्हापासून इ.स. १७८२ म्हणजे न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभूणे यांनी नारायणराव पेशवेंच्या सुनावणी प्रकरणात देहांना प्रायश्चित सुनावण्यापर्यंत राघोबामुळे परशुरामभाऊंना असंख्य मानसिक क्लेश देणाऱ्या व अतोनात परिश्रमाच्या लढयांना सामोरे जावे लागले. जरी या सर्व लढायात भाऊ विजयी झाले. तरी स्वकीयांचे रक्त असे सांडलेले बघून त्यांना अनंत यातना होत.

इंग्रजांना सामील होऊन राघोबाने दगलबाजीची परिसिमा गाठली. इंग्रजांविरूध्दची बोरघाटाची लढाई (१७७६) भाऊंच्या पराक्रमामुळे गाजली. इंग्रजांचा मोठा पराभव झाला. या वेळीच्या तहाप्रमाणे राघोबाचा ताबा पुन्हा पेशवे सरकारकडे आला.

तद्नंतर देहान्त शासन झालेल्या राघोबाची जीव वाचवण्याची, क्षमायाचतेची व दया दाखविण्याची विनंती बारभाईनी मान्य केली. कोणत्याही उचापती व घडामोडी पासून पूर्ण अलिप्त राहण्याच्या सक्त अटीवर राघोबाला उर्वरित आयुष्यं फक्त ''हरि हरि'' म्हणत नासिक जवळ गंगापूर या गोदावरीच्या काठावरील गावात व्यतीत करण्यासाठी धाडण्यात आले.

राघोबाची पाठवणी कोणी करावयाची असा प्रश्न उपस्थित झाला. राघोबांने हट्ट धरला की, ''परशुरामभाऊ खेरीज कोणीही पाठीराखा मला चालणार नाही''[२७]

मराठेशाहीच्या सत्ताकारणात २७ ऑक्टोंबर १७९५ ला सवाई माधवराव मृत्यूमुळे मोठी पोकळी निर्माण होऊन शनिवारवाड्यात शह—काटशह, कारस्थान, प्रतिकारस्थान यांना ऊत आला. पेशवेदरबार व मराठा साम्राज्याचे त्यावेळी सर्वात विश्वासू पाईक म्हणून नाना फडणविसांनी तासगांवहून परशुराम भाऊंना मदतीसाठी बोलावून घेतले. भाऊच्या आयुष्याचा हा अंतिम काल (१७९५—१७९९) पुणे वास्तव्यात व्यतीत झाला. स्वामी निष्ठेने भाऊ राज्य कारभारात पडले. दुसऱ्या बाजीरावाला पेशवा करावयाचे नाही याबद्दल नाना फडणविस व भाऊंचे एकमत झाले. सत्य एवढेच की, दौलतराव शिंदेची मदत घेऊन नाना फडणविसांना वश केले. त्या दोघांनी मिळून ५ डिसेंबर १७९६ ला दुसऱ्या बाजीरावास पेशवा म्हणून जाहीर केले.[२८]

नानांनी परशुरामभाऊंच्यावर खोटे आळ घालून त्यांना सातारा येथे सहा महिने स्थानबध्द केले. ''हेचि फळ काय मम तपाला'' अशी भाऊंची अवस्था झाली. इ.स. १७९९ च्या सुमारास परशुरामभाऊ तासगांवी परत आले. भाऊंच्या

बद्द हरिपंत फडके ऐके ठिकाणी म्हणतात ''आम्हास भरवसा भाऊंचा तर नाना म्हणतात, भाऊंसारखा सरदार दौलतीत नाही.[२९]

परशुरामभाऊ जसे शूर योध्दे होते तसेच ते स्वामीनिष्ठ ही होते. भाऊंची स्वामीनिष्ठा मतलबी नसून प्रेम आणि कळकळीची होती. पेशव्यांच्या राज्याबद्दल भाऊंना अभिमान होता. पेशव्यांचे राज्य हे हिंदूचे राज्य असून ते कायम टिकावे अशी भाऊंची इच्छा होती. भाऊंना हिंदू राज्याचा अभिमान होता हे दर्शविणारा उल्लेख त्यांच्या एका पत्रात आला आहे.[३०] सर्व पटवर्धन घराणेच पेशव्यांच्या बद्दल स्वामीनिष्ठ होते.

पटवर्धन घराण्याने १७४० ते १८०० पर्यंत मराठी राज्यासाठी आतोनात कष्ट घेतले. ६० वर्षाच्या कारकीर्दीत या घराण्यातील तीस कर्ते पुरूष धारातिर्थी पडले. पेशव्यांनी पटवर्धनांना २५ लाखांचा सरंजाम आणि त्यासाठी मिरज व तुंगभद्रा—कृष्णेमधील प्रांत दिला. आणि ८००० घौडदल सरकारी तैनात ठेवण्याची आज्ञा दिली. गोविंदरावांचा मुलगा गोपाळराव व रामचंद्ररावांचा मुलगा मराठ्यांचे सेनाकर्ते सर परशुरामभाऊ पटवर्धन यांचे तासगांवला वास्तव्य कायम होते.

# संदर्भसूची


१. तुळपुळे शं. गो. (संपादक) — सागर प्रकाशन कोल्हापूर, प्राचीन मराठी कोरीव लेणी व लेख — पृष्ठ १३५

२. मोडक बा. प्र. कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थानाचा इतिहास भाग पृष्ठ ३३

३. सुनिल गायकवाड — सांगली तासगांव बेदाणा मर्चट असोशियन स्मरणिका — लेख वैभावशाली तासगांव

४. डॉ.जयसिंगराव पवार — मराठी सत्तेचा दय — पृष्ठी पब्लिकेशन कोल्हापूर २००३ मृत्यू १५० वा. पृष्ठ २६८

५. प्रा.एन.डी.परील, ल.प्रा.थोरात, प्रा.पवार, प्रा.पाटील — मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास फडके प्रकाशन कोल्हापूर पृष्ठ ४

६. रामचंद्र अनंत लागू — रावसाहेब गोपाळ पटवर्धन यांचे चरित्र पृष्ठ ५

७. संकपाळ एस. डी. — दि पटवर्धन ऑफ तासगांव पृष्ठ ४

८. डेव्हलपमेंट प्लॅन बुक पृष्ठ १४

९. राजेंद्र पटवर्धन मुलाखत

१०. डेव्हलपमेंट प्लॅन बुक पृष्ठ १७

११. सांगली जिल्हा महाराष्ट्र गॅझेट १९९९ पृष्ठ २२

१२. साप्ताहिक सकाळ मे २०१४ देवस्थान विशेषांक पृष्ठ ५०

१३. राजेंद्र पटवर्धन मुलाखत

१४. स.ह. सहस्त्रबुध्दे — सरदार परशुरामभाऊ पटवर्धन पृष्ठ ८

१५. वासुदेव वामन खरे — हरिवंशाची बखर पृष्ठ १ विश्वकोष खंड ९ मधून

१६. सर परशुरामभाऊ पटवर्धन स्मरणिका २००३ किता २, पान १

१७. वा.वा.खरे — हरीवंशाची बखर पृष्ठ ४

१८. गो.वि.आपटे — पटवर्धन घराण्याचा इतिहास भाग १, पृष्ठ १७५

१९. धों. बा. सहस्त्रबुध्दे, पेशवाईतील परशुरामभाऊ पटवर्धन, पृष्ठ २२

२०. संकपाळ एस.डी. — दि पटवर्धन्स ऑफ तासगांव, प्रबंध १९८९, पृष्ठ २६, १८किता — २

२१. पुणे रेसिडेन्स रेकॉर्ड भाग — ३, पृष्ठ ५५

२२. कित्ता २ संदर्भक्रमांक — ५, पृष्ठ १४७

२३. प्रा.ना.सी. दीक्षित, मराठ्यांचा इतिहास, पंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, जून १९८७, पान ९० किता ६५

२४. राजेंद्र पटवर्धन — सर परशुरामभाऊ पटवर्धन घराण्यातील हस्तलिखीत ६५

२५. राजेंद्र पटवर्धन — श्रीमंत परशुरामभाऊ व रघुनाथराव पेशवे हस्तलिखीत संघर्ष — हस्तलिखीतातून पान ३

२६. किता ३ संदर्भ क्र. २६ पृष्ठ १५७

२७. राजेंद्र पटवर्धन हस्तलिखीत — राघोबादादा आणि परशुरामभाऊ पटवर्धन पान २

२८. राजेंद्र पटवर्धन स्मरणिका सर परशुरामभाऊ पटवर्धन मधून पान २

२९. वा.वा.खरे ऐतिहासिक लेख संग्रह खडे ११ — ४५७४

३०. मिस संकपाळ एस.डी. — दि पटवर्धन्स ऑफ तासगांव, पृष्ठ २७

# प्रकरण - ३

## उत्तर पेशवाईतील पराक्रमी योध्दा सेनाकर्ते सर परशुरामभाऊ पटवर्धन

१. सर परशुरामभाऊंचा सन्मान

२. इंग्रज – मराठा पहिले युध्द (१७७५)

३. सर परशुरामभाऊ पटवर्धन व टिपू युध्द (१७९०–९१)

४. परशुरामभाऊ व निजाम (खडर्याची लढाई) (११ मार्च १७९५)

५. पेशव्यांकडून सर परशुरामभाऊंचा सन्मान

६. सर परशुरामभाऊ पटवर्धन व कोल्हापूर छत्रपती संघर्ष (१७९२ ते १७९९)

नानासाहेब पेशव्यांच्या काळात हरभट पटवर्धनांच्या सहाही मुलांना मराठी रराज्याच्या प्रशासन, लष्कर विभागात स्थान मिळाले. त्यापैकी रामचंद्रपंत नानासाहेब पेशव्यांच्या बरोबर उत्तर मोहिमेत असताना १७४९ मध्ये ब्रम्हावर्तानजिक शिवराजपूर येथे पोटाच्या आजाराने मृत्यु पावले.

त्यांना परशुराम नावाचा एकच पुत्र होता. नानासाहेबांनी रामचंद्रपंताचा असलेला सरंजाम परशुराम भाऊंना जोडून दिला आणि परशुराम भाऊंचा मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेत पुढे कर्तबगार सरदार म्हणून उदय झाला.

परशुरामभाऊ हे जसे शुर योध्दे होते तसेच स्वामीनिष्ठ होते. त्यामुळे श्रीमंत नानासाहेब पेशव्यांचे ते विश्वासू व बिनीचे सरदार ही बनले.

## परशुराम भाऊंचा नानासाहेब पेशवेकडून सन्मान - सावनूर मोहिम (१७५९)

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी कर्नाटकातील सावनूरवर हल्ला चढविला तीन महिने घनघोर युध्द झाले. या युध्दात पुरूषोत्तम दाजी व अवघे वय चौदा वर्षे असलेले परशुरामभाऊ यांनी युध्दात प्रयत्नांची शिकस्त करीत विलक्षणरित्या शत्रुची कत्तल करून सावनुरकरांचा विमोड केला. या युध्दात भाऊंनी जे कौशल्य दाखविले ते पाहून मी मी म्हणणरे योध्दे चकित झाले.

नानासाहेब म्हणाले 'शाब्बास मुला शाब्बास! या लढाईचे यश तुझ कडे आहे' या अद्वितीय पराक्रमाबद्दल नानासाहेब पेशव्यांनी कोरेगांव गाव गादीसहित व १२ लाख रूपयाची सनद दिली. त्यामुळे उत्तरोत्तर पराक्रम करण्यास स्फूर्ती मिळाली.[१]

## इंग्रज मराठा पहिले युध्द (१७७५)

नारायणरावाच्या वधानंतर वारभाईचे कारस्थान सुरू होऊन रघुनाथरावास पेशवेपद मिळता कामा नये यासंबंधी कारवाया सुरू झाल्या असता इंग्रज वकील मॉस्टीन याने या गोंधळाचा फायदा घेऊन वसई, साष्टी मिळवण्याचे ठरविले व रघुनाथरावाशी संधान साधले. रघुनाथरावाने इंग्रजाकडे पैसा आणि फौजेची मागणी केली. त्यांनी डिसेंबर १७७४ ला ठाणे आणि करंजा बेट जिंकले होते. तेव्हा निाराशा अवस्थेत रघुनाथराव सुरतला इंग्रजांच्या आश्रयास ६ मार्च १७७५ सुरत तहान्वये गेला.[२] कर्नट किटींग व रघुनाथराव यांना पुणेकडे जाताना गुजराथमध्ये हरिपंत फडके यांनी आरास येथे अडविले घनघोर युध्द झाले. उभयतांची फार मोठी हानी झाली. मात्र युध्द निर्णायक झाले नाही. या पहिल्या इंग्रज मराठा युध्दात सेनापती गार्डर्ड याला बोरघाटापासून पनवेलच्या खाडीपर्यंत चेपत नेण्याची उत्कृष्ट सर परशुरामभाऊ पटवर्धन यांनी केली.[३] त्यामुळे इंग्रजांना पहिल्या युध्दात तह आणि वाटाघाटी करणे व रघुनाथरावाच्या एवढयावरच समाधान मानावे लागले रघुनाथरावांच्या पदरी निराशाच आणि परशुरामभाऊंनी आपले दाखवलेले युध्द कौशल्य इंग्रजांना अचंबित करणारे ठरले.

## परशुरामभाऊ पटवर्धन यांची टिपू विरूध्द मोहिम (१७९०-९१)

सावनूर मोहिम (१७५५) व इंग्रज मराठा पहिल्या युध्दातील (१७७५) यशानंतर परशुरामभाऊंच्या जीवनातील अत्यंत महत्वपूर्ण लढाई म्हणजे टिपू विरूध्दची होय. टिपूने मराठ्यांच्या धारवाड किल्ल्यावर हल्ला करून नरगुंदकरांच्या व कित्तुर संस्थानाचा सत्यानाश केला. हे वर्तमान श्रीमंत पेशव्यांना कळताच त्यांनी परशुराम भाऊंना हुजूर पथकासह धारवाडचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी पाठविले. किल्ल्यावरून तोफेचा गोळा लागू नये इतक्या अंतरावर भाऊंनी किल्ल्याला वेढा दिला. टिपूचे सैन्य मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे भाऊंना तेथे बरेच दिवस राहणे भाग पडले. इकडे पुणे दरबारात नानांचे कान फुंकले व भाऊ धारवाडमध्ये आपल्या दोन बंधूसह दिवाळी साजरी करीत आहेत असे सांगितले तेव्हा नानांनी त्याची शहानिशा करण्यासाठी दोन दुत पाठविले पुणे दरबारी आपल्याविषयी संशय व्यक्त केला जातो याचा भाऊंना खेद झाला त्यांनी प्रतिज्ञा केली की,

'उद्या सुर्यास्तापर्यंत मी किल्ला तरी सर करीन किंवा श्रीमंत देतील ती शिक्षा मी भोगीन'

दुसऱ्या दिवशी गजाननाचे स्मरण करून किल्ल्याच्या तटाला मोर्चे लावून तोफांचा भडीमार केला. पटवर्धन बंधूनी शौर्याची परिसिमा केली. त्यांचे चुलतबंधू रामचंद्र भास्कर धारातिर्थी पडले. धारवाडचा किल्ला सर झाला. या किल्ल्याचा सुभेदार बद्रीजमालखानाला हुसकावून लावून त्या किल्ल्यावर पेशव्यांचे निशाण चढविण्यात भाऊंनी आपली मर्दुमकी शर्थ केली. या किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण चढविले. धारवाडच्या या मोहिमेत परशुरामभाऊंच्या सर्वच गुणांची चांगली कसोटी लागली.[४]

परशुराम भाऊंच्या रणकौशल्याबद्दल स्वकीय व परकीयांनी मुक्त कंठाने स्तुती केली आहे. भाऊंच्या शूरपणाबद्दल चांगले उद्गार इंग्रजांनी काढल्याचे पुणे रेसिडेन्सी रेकॉर्डमध्ये नमूद आहे. सावशीच्या लढाईत पटवर्धनांचा जो पराभव

झाला त्या लढाईत भाऊ हजर नव्हते.  भाऊ हजर नसल्यामुळे अनर्थ पटवर्धन घराण्यावर ओढवला असे नाना फडणीसांनी लिहले आहे.

नानांनी याबाबत परशुरामभाऊस लिहले.

'आपल्या सारखे कृतकर्म या फौजेत असते तर असे झालेच नसते.[५] इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत वडगाव जनरल गॉडर्डचा पराभव करण्यास आणि कर्नाटक प्रांतात पेशव्यांचा अंमल स्थिर होण्यास परशुराम भाऊंचा पराक्रम, दुरदृष्टी, युध्दाविषयी नियोजन लष्करी शिस्त, कौशल्य स्वामीनिष्ठा कारणीभूत आहे.

# परशुराम भाऊ व निजाम संघर्ष
# खड्र्याची लढाई (११ मार्च १७९५)

१७६२ साली निजामाचा मराठ्यांनी राक्षसभुवनच्या लढाईत पराभव केल्यानंतर १७९२ पर्यंत पेशवे — निजाम संबंध चांगले राहिले किंबहुना औरंगाबाद तहाच्या अटीनुसार ८२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मराठ्यांना त्यांने देऊनही टाकला होता. मात्र नारायणरावाच्या मृत्युनंतर जे बारभाई कारस्थान झाले त्यात निजामास असे वाटले की, आता मराठी सत्ता दुबळी झाली आहे. दक्षिणेत आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यास हीच संधी आहे. म्हणून त्याने औरंगाबाद तह धुडकावत चौथाई व सरदेशमुखीच्या मराठ्यांच्या हक्कास नकार दिला. मराठ्यांच्या दुर्दैवाने या काळात महादजी शिंदेचा मृत्यु झाला होता तेव्हा नानांनी पेशवेसरदारांना हैदरचा वकील निजामास भेटण्यास सांगितले. पण निजामाचा कारभारी मशीर उत्मुक ने पेशव्यांचा निंदानालस्ती करीत अपशब्द वापरले. त्यातून उभय पक्षात युध्द होणार हे अटळ झाले.

नाना फडणीसांनी या लढाईची सुत्रे सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडे दिली भाऊ जी आज्ञा देतील ती सर्वांनी मानावी असे सांगितले सोबत दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, रघुजी भोसले, सवाई माधवराव ही या लढाईत होते. या स्वारीत पेशव्यांची एकंदर फौज तेरा हजार स्वार व दहा हजार पेंढारी होते. या लढाईचे परशुरामभाऊंचे दोघे चिरंजीव रामचंद्रपंत व हरीपंत भाऊ बरोबर हजर होते.[६] या लढाईत सर्व मराठे सरदार व लोक हे आपण एक राष्ट्र असे समजून या प्रसंगी जसे एक झाले तसे ते पूर्वी व नंतर कधीच झाले नाहीत ही लढाई पेशव्यांच्या आणि निजामाच्या सरहद्दीवर पुण्यापासून सव्वासे मैलावर असलेल्या खड्र्यानजीक झाली. त्यात निजामाचा पराभव ११ मार्च १७९५ रोजी झाला.[७]

## निजाम - मराठा तह

१. निजामाने मशीर अल्मुल्क या कारभाऱ्यास मराठ्यांच्या स्वाधीन करावे.

२. निजामाने युध्द खर्च व थकलेली खंडणी म्हणून पाच कोटी रूपये द्यावेत.

३. उदगीर तहाप्रमाणे सर्व प्रदेश निजामाने मराठ्यांना द्यावा.

४. नागपूरचे भोसले यांना स्वतंत्र अठ्ठावीस लाख रूपये वतनाचा प्रदेश परत करावा.

५. निजामाने दक्षिणेत गोबंदी जारी करावी.

६. कोणीही धर्माचरणाबाबत त्रास देऊ नये.

वास्तविक लढाईच्या अगोदर निजामाने मध्यस्थाकरवी परशुरामभाऊशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला. परंतु भाऊंनी त्यास जबाब दिला की, चौथाई, सरदेशमुखीची बाकी तीन कोट रूपये आधी भरा मग तहाचा विचार करू आणि तह न झाल्यास मी पेशव्याचा सरदार आहे. तुमच्यावर हक्ष चढविणे हे माझे कर्तव्य आहे. आणि पटवर्धनी आपला पराक्रम सार्थ केला व वरील अटी निजामास मान्य करावयास लावल्या.

परशुरामभाऊ पटवर्धनांनी दक्षिणेतील या शत्रुचा नाश करून मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. एवढेच नव्हे तर मराठा सरदारातील आपआपसातील मतभेद मिटवण्यातही भाऊ यशस्वी झाले.

## परशुरामभाऊंचा पेशव्यांच्या कडून सन्मान

खड्र्याच्या लढाईत जो पटवर्धनांनी पराक्रम केला त्याबद्दल श्रीमंत सवाई माधवरावांनी खूष होऊन परशुरामभाऊ व त्यांचे बंधू चिंतामणराव आणि रघुनाथ नीलकंठ यास १७९५ ची सनद करून दिली. एकंदर सरंजाम २५५२१०० रूपयाचा असून २१९३२७७—६—६ रूपयाचा मुलूख लावून दिला.[८]

खड्र्याची लढाईवरून परशुरामभाऊंनी बाळासाहेब मिरजकर यास पाठविलेले पत्र

**(फाल्गुन व—६—१२ मार्च)**

काल छ.१९ सावानी बुधवारी प्रात:काळी नवाबाच्या कुचाची बातमी आली. त्याजवरून आम्ही आपली फौजसुध्दा तयार होऊन गेली रा.बाबा फडके व शिंदे, होळकर व भोसले यांच्याही फौजा तयार होऊन गेल्या तो त्यांची गाठ पडली. त्यांचे बाहेर बुनगे चालले होते. तो आम्ही जाऊन पुढे उभा राहिलो. शिंदे आमच्या डाव्या बाजुस होते. इतक्यात दोन प्रहराच्या सुमारास नबाबाकडील भारामल व असद्अल्लीखान वगैरे सरदार आघाडीचे चालणार आम्हावरी चालून आले. त्यांची व आमची झटापट झाली. मला उजवे बाहुधावर व कपाळास तलवारीची जखम लागली. अगोदर दोन वार पट्यावरील तटले खोवळा पट्टयाचा तुकडा आहे. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यास दाव्या हातावर जखम आहे. चिरंजीव विठ्ठलराव धोंडदेव गोळी लागून ठार जाहले. ईश्वरी — इच्छेस इजाज काय?

चिरंजीव सरकार कामास आला वृध्दापकाळी तो रा.आपा यांसी दु:ख झाले. होणारास उपाय नाही. माझी जखम हलकी आहे. काल रात्रीस बुनऱ्यांत येऊन जखम टाक्याने शिवून शेकीवली. आज प्रात:काळी सडे स्वारीस आलो. इतक्यात बातमी आली की खासानवाब मोहरीचा घाट चढोन मध्यरात्रीस गेला त्या जवरोज फिरोज सरकारच्या फौजा पाठीमागे गेल्या आहेत. बुनगे लुटले.

कालच्या लढाईची शर्थ जाली प्रहर दिवसापासून हिरीच्या तिकडील व इकडील होत होत्या त्याचा विस्तार मागाहून लिहून पाठवू वरकड सारी मंडळी खैर आहे. चिरंजीव आपा, बाबा सारी मंडळी फौज घेऊन गेली आहेत. चिरंजीव रा.सदोबा जोशी यास ही जखम लागली आहे. आणि बहुत जखमा झाल्यास. नवाबाकडील फौजेचा मोड जाहला. रात्रीस खासा नबाब मोहरीचा घाट चढले म्हणोन बातमी आहे. फौजा आज पाठीस लागल्या ओहत. बुनग्यांत मोड (१) लागले लूट येत आहे. चिंतामणभट खाडीलकर ठार जाहला अस्थि मागाहून लावून देतो.

अस्थि लावून दिल्या लढाई मोठी शर्तची जाहली. श्रीमंतांचे पुण्यविचित्र मोठे यश आले. नबाबाचा दौलत गारद व्हावयाचा रंग आहे. श्री इच्छेरूप घडेल ते खरे. नबाबाकडील भारामल व रादानखान व वजीरखान वगैरे पाच सात सरदार ठार पडले व हजार पावेतो माणुस कामास आले या उपर काही नाही खाना २० साल खमस तिसैन.[१]

वरील पत्रावरून लक्षात येते सर परशुरामभाऊ पटवर्धन यांनी श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचे राज्य सावरण्याचा, विस्तारण्याचा प्रयत्न कसोशीने करून आपली स्वामीनिष्ठा पेशव्याप्रती सिध्द केली व मराठी राज्याचा दारा वाढविला. निजामासारख्या प्रबळ शत्रुला शह दिल्याने शनिवारवाड्यात भाऊंच्या पराक्रमाचे कौतुकही झाले.

## परशुराम भाऊ पटवर्धन व कोल्हापूर छत्रपती संघर्ष-१७९२-१७९९

पटवर्धन सरदार हे पेशव्यांनी करवीरकर छत्रपती शह बसावा म्हणून निर्माण केले, पटवर्धन आणि कोल्हापूरचे छत्रपती यांच्यात सतत संघर्ष होत, म्हणून परशुराम भाऊंनीच कोल्हापूरच्या स्वारीस जावे असे पुणे दरबारात ठरविले,[१०] परशुरामभाऊ,बाळाजीपंत व रामचंद्रगणेश हा हे मोहिमेवर जाणार होते. पण जाने. १७७७ ला सावशीच्या लढाईत पटवर्धनाचा पराभव झाल्याची बातमी कळल्यामुळे परशुरामभाऊ तिकडे गेले. या दरम्यान पेशव्यांनी वडगावला इंग्रजांचा पराभव केला त्यामुळे राघोबा दादाचे सर्व मनसुबे उधळले गेले. हाच राघोबा करवीर करांचा पाठिराखा होता. त्यामुळे नाना फडणवीसांनी परशुराम भाऊंना पत्र लिहीले सुरापुरच्या खंडणीचा उलगडा झाल्यावर तुम्ही करवीरकर महाराज व कित्तुरीकर व देसाई यांच्या तालुक्यात जाऊन बंदोबस्त करावा. तेव्हा परशुरामभाऊनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पंचवीस तीस खंडी दारू, पाचसात थोर तोफा, शेपन्नास कामठी व गोलंदाज तयार ठेवण्यासाठी गंगाधरराव पटवर्धन मिरजकर यांना कळविले[११] की तीन आठवड्याच्या प्रयत्नांनंतर अकीवाटचे ठाणे जिंकले पण यात भाऊंचे प्रचंड नुकसान झाले त्या नंतर भाऊंनी एप्रिल १७८० ला शिरोळ जिंकले पटवर्धनांचे हे वाढते यशपाहुन कोल्हापूरच्या छत्रपती शिवाजीमहाराजांना पेशव्यांशी करार करण्यासाठी बाळ जोशीराव व शिवराव सुरनीस यांना पाठविले. त्यांनी हा करार २२ जाने. १७८१ ला पूर्ण केला.[१२]

सावंतवाडी करांचे किल्ले व मुलुख छत्रपतींनी आपल्या ताब्यात घेतले होते ते परत करावेत असे पेशव्यांच्याकडुन शिवाजी महाराजांना कळविण्यात आले होते परंतु छत्रपतीनी त्याकडे लक्ष न दिल्याने पेशव्यांनी भाऊंना आज्ञा केली त्यानुसार भाऊ तासगांवी आले. व सैन्याची जमवाजमव करून आपले चिरंजीव रामचंद्र पंत आप्पासाहेब यांच्याकडे सुत्रे दिली. त्याच्याबरोबर

१. ४००० घोडेस्वार
२. २००० पायदळ
३. २ तोफा

एवढी युध्दसामुग्री दिली. रामचंद्रपंतांनी आळत्यात वेढा घातला त्यावेळी स्वतः करवीरकर शिवाजी महाराज डिसेंबर १७३९ ला चालुन गेले[१३] यात जखमी होऊन रामचंद्रपंत करवीरकरांना हाती लागले. त्यांच्या जखमा बऱ्या झाल्यानंतर त्यांना वस्त्रे अलंकार व पोशाख देऊन पाच गाव इनाम देऊन परत पाठविले. तेव्हा भाऊ म्हणाले पुत्र मेला असता तर फार उत्तम झाले असते. त्यानंतर भाऊंनी फाल्गुन शुध्द १० रोजी स्वतः कोल्हापूरला वेढा घातला. तेव्हा करवीरकरांनी भाऊंच्या बरोबर तह केला.

## करवीरकर छत्रपती शिवाजी व परशुरामभाऊ पटवर्धन तह

१. छत्रपतींनी पटवर्धनांना १० लाख रूपये द्यावेत.

२. पैकी तीन लक्ष रूपये रोख द्यावेत.

३. रक्कमेचा पूर्ण भरणा होईपर्यंत रत्नाकर राजाराम, नारायणराव पाटणकर यशवंतराव घाडगे, गुनाजी गायकवाड आणि प्रितीराव चव्हाण इ. आसामी ओलीस मागितले.[१४] अशा रितीने भाऊंनी करवीरकरावर विजय मिळविला. पण ही गोष्ट कोल्हापूर करांना फार खटकली.

२७/१०/१७९५ ला सवाई माधवरावचा मृत्यु झाल्यानंतर पुण्यात निर्माण झालेल्या राजकीय अराजकतेचा फायदा घेऊन भाऊंनी घेतलेला प्रदेश करवीरकरांनी ताब्यात घेतलाच आणि तासगांववरती चाल केली. तासगांव मध्ये मोठ मोठे वाडे व इतर मालमत्ता होती. छत्रपतींनी ती जाळून टाकली व कृष्णेपर्यंत आपली ठाणी वसवली.[१५] यावेळी परशुरामभाऊ बाजीरावाच्या कैदेत सापडले होते. परंतु करवीर करांच्या विरूध्द लढयासाठी बाजीरावाने परशुराम भाऊंना कैदेतून मुक्त केले.

## परशुराम भाऊंची छत्रपतींच्या कोल्हपूरवर दुसरी स्वारी (१७९९)

१७९९ ला भाऊ तासगांवी परत आले. त्या आधीपासूनच काही वर्षे सांगलीचे प्रथम संस्थानाधिपती श्रीमंत चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धन हे त्यांच्या सहवासात होते. हे मिरजकर संस्थानिक घराण्यातील होते. सर्व बंधूत सर्वात शूर व कर्तबगार असलेला चिंतामनरावला थोरल्या बंधूनी न्या हक्क दिला नाही म्हणून भाऊंना त्यांनी गळ घातली यासाठी ते भाऊ बरोबर जून १७९९ ला कर्नाटकातील मोहिमेवर गेले. पण चिंतामनराव मध्ये भाऊंना सोडून परत आले. व स्वतंत्र सांगली सांगली संस्थानाची स्थापना केली. त्यानंतर भाऊंनी कोल्हापूरकरांचा समाचार घ्यावयाचे ठरविले.

परशुरामभाऊंनी ५००० स्वार, २००० पायदळ, दोन तोफा एवढी तयार निशी कोल्हापूर परगाण्यातील चिकोडीवर हल्ला करून ताब्यात घेतले. त्यावेळी परशुरामभाऊहमीदवाड्यापासून आठ मैलावर असलेल्या पट्टणकुडी येथे मुक्कामास होते. तेव्हा प्रितीराव चव्हाण उर्फ हिम्मतबहादूर यांचे थोरले चिरंजीव उदाजीराव आबासाहेब यांच्या छत्रपतींनी हिम्मतबहाद्दर किताब देऊन शिक्के वजीफटका वगैरे अष्टप्रधानाच्या मरातबाप्रमाणे दिली आणि प्रितीराव उर्फ बापूसाहेब यांना नवीन उमदेतुल उमराव असा किताब देऊन परशुरामभाऊ विरोधी पाठविले. यावेळी परशुरामभाऊ काहीसे बेसावध होते. तरी अत्यंत धैर्याने लढले. हैबतराव गायकवाड यांनी भाऊंच्या मातेवर वार केला त्याही परिस्थितीत तेवढयाच द्वेषांनी भाऊने ४ — ५ लोकांवर वार केला एवढयात महाराजांच्या इतर सैन्याने जोरदार आक्रमण केल्याने परशुरामभाऊ ठार झाले यात पटवर्धनांचा जो पराभव झाला यात प्रामुख्याने प्रितीराव चव्हाण आणि राजाज्ञा यांच्याच पराक्रमाचा वाटा मोठा आहे.[१७] परशुरामभाऊ ठार झाले (१७ सप्टेंबर १७९९) त्यांच्या बरोबर त्यांचे चुलत बंधू विनोबा, दोन सेवक व अश्वदल यांनाही मारण्यात

आले.  मराठा साम्राज्याचा सेनापतीचा असा भयंकर अंत झाला. या कृत्याबद्दल कोल्हापूर छत्रपतींना उद्वेग व पश्चातापाची भावना झाली.  त्यातून त्यांनी हमीदवाडा (ता.कागल) पट्टणकुडी येथे परशुरामभाऊंचे स्मारक बांधले आहे.

# संदर्भसूची


१. Siddharth Kattimani - Siddharth Research Evaluation Vol II Dec 2013 Page 70
२. प्रा.एन.डी.पाटील, प्रा.थोरात, प्रा.पवार, प्रा.पाटील – मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास फडके प्रकाशन २०१२ पृष्ठ १५८
३. सहस्त्रबुध्दे स.अ.सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम. पृष्ठ २२
४. सहस्त्रबुध्दे स.अ.सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम. पृष्ठ ५
५. व.वा.खरे – ऐतिहासिक लेख संग्रह खडे ६ – १९८९
६. सहस्त्रबुध्दे धों.वा. पेशवाईतील सर परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम पृष्ठ २२
७. प्रा.डॉ.सरल धारणकर व प्रा.डॉ.बी.डी.खणे – मोगल मराठा कालखंड जाने २००३ पृष्ठ ७५
८. संकपाळ एस. डी. – दि.पटवर्धनस् ऑफ तासगांव प्रबंध १९८९ पृष्ठ ३०
९. संकपाळ एस. डी. – दि.पटवर्धनस् ऑफ तासगांव प्रबंध १९८९ पृष्ठ ३३
१०. वा.वा.खरे ऐतिहासिक लेख संग्रह खंड – ६, १९८९
११. व.स.मा.गर्गे – करवीर रियासत पृष्ठ ३३७
१२. व.स.मा.गर्गे – करवीर रियासत पृष्ठ ३३९
१३. व.स.मा.गर्गे – करवीर रियासत पृष्ठ ३५१
१४. संकपाळ एस.डी. – दि पटवर्धनस् ऑफ तासगांव प्रबंध १९८९, पृष्ठ ५३
१५. संकपाळ एस.डी. – दि पटवर्धनस् ऑफ तासगांव प्रबंध १९८९, पृष्ठ ५४
१६. दि तासगांव फेस्टीवल २०१७ रोटरी क्लब पृष्ठ १८
१७. स.मा.गर्गे करवीर रियासत करवीर छ.घराण्याचा इतिहास ९ जून १९८० पृष्ठ ४३२.

# प्रकरण ४

## सर परशुरामभाऊंच्या धार्मिक उत्सवातून समाजावर झालेला सामाजिक परिणाम

१. प्रस्तावना — स्थापत्य कला विकास

२. तासगांवचा ऐतिहासिक राजवाडा

३. श्री गणेश मंदिराची निर्मिती

४. श्री गणेश मंदिराची रचना — गोपूर

५. मंदिराचे वैशिष्ट्ये

६. तासगांवचा रथोत्सव सामाजिक ऐक्याचे प्रतीक

७. हिंदू — मुस्लीम ऐक्याचे दर्शन — पिरासाहेबांचे देवस्थान

८. कला, चित्रकलाकारांना आश्रय

९. चित्रकला व काष्टशिल्पे

१०. कलावंतिणीचा बुरूज

११. संगितकार, पुरोहितांना आश्रय, इनामे, वर्षासने

१२. व्यापारी व साहुकारास आश्रय — व्यापाऱ्यास इनामे

१३. शेती सुधारणा व जमिन महसूल पेशवाई पध्दत

# स्थापत्य कला विकास

## प्रस्तावना

सांगली जिल्ह्याच्या ऐतिहासिक इतिहासातील सुवर्णपाने चाळताना लेखणीत ताकद यावी, वक्तृत्वाला सामर्थ्य यावे, नेतृत्वाला खंबीरता लाभावी आणि धार्मिक रूढी परंपरांचे जतन करताना धर्म आणि संस्कृतीचा अभिमान सतत बाळगत जगणे चैतन्याचे व्हावे इतका सांगली जिल्ह्याला, तासगांव परगाण्याला ऐतिहासिक वारसा आहे.

यादव राजा कृष्ण यांने ८५५ वर्षापूर्वी दिलेल्या भूदानाचा उल्लेख तासगांवमध्ये मिळालेल्या ताम्रपत्रात आहे. आजच्या मांजर्डे गावचा उल्लेख मांजर वाहक असा असून गोवरू (गौरगाव), बालगवाड (बलगवडे), हार्धिनौर (हातनूर), पेढ (पेड) असा आहे.[१] या सर्व गावांच्या केंद्रस्थानी आहे तासगांव परगाणा होता.

मराठ्यांच्या उत्तरार्धात पेशवाईने स्वराज्याचे जे सामाज्यात रूपांतर केले त्यात महाराष्ट्रातील अनेक नव्या सरदारांचा झालेला उदय कारणीभूत आहे शिंदे, होळकर, पटवर्धन, पवार या घराण्यांनी आपल्या पराक्रम शत्रूचे क्षात्रंतेज नष्ट केले व महाराष्ट्र धर्म जागविला.

रामचंद्रपंत पटवर्धन यांचा १७४९ साली मृत्यु झाल्यानंतर त्यांचे चिरंजीव सर परशुरामभाऊ पटवर्धन यांना नानासाहेबांनी सरंजाम लावून दिला आणि परशुराम भाऊंनी तो विश्वास सार्थ केला. भाऊंनी वयाच्या चौदाव्या वर्षी हाती घेतलेली तलवार १७९९ अखेरपर्यंत रणांगणी गाजवली पेशव्याशी एकनिष्ठ असणारा, सातारच्या छत्रपतींशी सतत प्रामाणिक राहणारा हा सरदार शूर व मुत्सद्दी योध्दा म्हणून उदय पावला. त्यांनी आपल्या पराक्रमाला साजेल इतका लोक विश्वास संपादन केला. त्यांच्या पराक्रमाचे मर्म होते गणेश भक्ती. ते कोणत्याही युध्दमोहिमेवर जाण्याआधी गणपती पुळयाला जाऊन श्रींचे दर्शन घेत मगच युध्दावर जात. १७७३ मध्ये एका संकष्टीला भाऊंना स्वप्नात श्रींचा दृष्टान्त

झाला आणि 'श्रीं'नी भाऊंना तासगांवात मंदिर उभारयाची आज्ञा केली.[२] त्यामुळे तासगांवला त्यांनी गणेश मंदिर बांधले आणि रथोत्सवाच्या माध्यमातून संस्थानांतील रयतेची मने जोडली कारण भाऊंना माहित होते इतकी राजकीय आक्रमणे हिंदूस्थानवर झाली, सांस्कृतिक झाली तरी सांस्कृतिक ऐक्य टिकून आहे. हे केवळ दैवत्वामुळे. आपल्या पूर्वजांनी गावे वसवताना खूप खोलवर विचार करून येथील मंदिराची रचना केली आहे. एका गावात देवी / देव दुसऱ्या गावातील देवीची / देवाची बहिणभाऊ आहे. अशा तऱ्हेच्या कथा प्रस्तुत केल्या त्यामुळे त्या काळात वाहतुकीची साधने नव्हती अशा वेळी लोक आपआपल्या गावातील देव घेऊन तिच्या बहिणीला, भावाला भेटायला जात. एकमेकांच्या अडचणी समजावून घेत.[३] त्यातून निर्माण झालेली उत्सवप्रियता धर्म, देश, संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी राज्यकर्त्याच्या पाठीशी उभा राहिला. असाच दृष्टीकोन थोड्याशा वेगळया पध्दती परशुरामभाऊंनी मंदिरे स्थापना, मंदिरांचा जीर्णोध्दार मंदिरांना देणग्या देऊन अंमलात आणला.

परशुरामभाऊंनी धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाज संघटन करताना परगाण्याची आर्थिक स्थिती चांगली रहावी, लोकांना पिण्याच्या पाण्याची, शेतीच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून चिंचणी गावाजवळ मोठे धरण बांधले. १७५८ साली फ्रेंच लेखक डयू पिरॉन अॅक्वटेल यांनी नानासाहेब पेशव्याच्या काळात तासगांवला भेट दिली असता 'पाटाद्वारे पाणी वाहून नेण्याची व्यवस्था असलेले व मनोरे असलेले गाव असा तासगांवचा उल्लेख केला आहे.'[४]

अतीत वैदिक अभ्यागत पुराणिक यांचे ते उपासक होते. विद्वान व पूज्य अशा शास्त्री पंडीतास व वैदिकास भाऊंनी इनामे, वर्षासने दिली होती. आपल्या परगाण्यात त्यांनी सुंदर राजवाडा, श्री गणेश मंदिर, श्री सिध्देश्वर मंदिर जिर्णोध्दार, हाटकेश्वर मंदिर जीर्णोध्दार, विठ्ठल मंदिरास इनाम व विष्णू मंदिर स्थापना साह्य, श्री काशी विश्वेश्वर मंदिर, भिलवडीला घाट बांधला. चिंचणी परशरामाचे मंदिर अशी जवळपास १४ मंदिर उभारली आणि सर्व समाजाला

एकसंघ केले. तसेच संस्थानांना बाहेर पंढरपूर येथे पांडूरंगाचा सभा मंडप मारूतीचे देवालय आणि नगारखाण्याकरिता कमान बांधली. अमृतेश्वर देवालयाचा जीर्णोध्दार केला. या श्रेत्री विठ्ठल मंदिराचा वाडा बांधला[५] व अन्नछत्रालय उभारले. काशी क्षेत्री शिवालय बांधले लक्ष ब्राम्हणास इच्छा भोजन घातले. येथे भाऊंनी वाडा बांधला.[६] पुण तांबे येथे गोदावरीच्या काठी शिवालय, वाडा घाट बांधून तटभिंत बांधली. आपल्या मुळगांवी कोतवडे येथील कुसुमेश्वर देवास प्रतिवर्षी महारूद्राभिषेक भाऊ करीत. कोकणातून घाटावर येणाऱ्या पुरोहितगिरी करू पहाणाऱ्या ब्राम्हणास आंबा घाटात भोजनाची व्यवस्था केली होती. चिमाजी आप्पास पेशवेपदाची वस्त्रे झाली. (फेब्रु १७९६) त्या दिवशी भाऊंनी गणपती पुळ्याच्या गणपतीस चौघडा देवविला.[७]

वरील स्थापत्य बांधकामे करताना भाऊं स्वारी निमित्त कर्नाटक प्रांतात आंध्र, राजस्थान विभागात जात असताना दक्षिणेत असणाऱ्या कलाकारांना आपल्या परगाण्यात आणून भाऊंनी त्यांना व्यवसाय दिले. कारागिराची कारागिरी हीच भाऊच्या हृदयी वसत असे. जात, धर्म, पंथ ते कधी पहात नसत.

व्यापार वृध्दी व्हावी यासाठी त्यांनी पैलवान, शेटे, हिंगमिरे, आडके सारखे लोक दक्षिणेतून आणले आणि पेठा वसविल्या. परगाण्यातील शेतकरी, व्यापारी, उद्योग करणारास आर्थिक अडचणी येऊ नयेत. शेतकऱ्याला शेती पिकवताना आर्थिक सहाय्य व्हावे या दृष्टने भाऊंनी काही सावकार घराणी पुणे प्रांतातून आणली जोग, हुपरीकर, जोशी इ. मंडळी यात येतात. तर मंदिरांच्या व्यवस्थापनासाठी सातारा प्रांतातून गुरव मंडळी आणली. पुरोहितगिरीसाठी जोशी, कुलकर्णी, अभ्यंकर, सोहनी या लोकांना आणू त्यांना इनामे, वर्षासने दिली.

तासगांवला निसर्गाचे वरदान मिळाले असून जवळूनच काही अंतरावरून कृष्णा नदी वाहते येरळा नदी आणि कापूर ओढा याच्यामध्ये टुमदार तासगांव वसले आहे. भाऊंनी सांगलीच्या बाजूला कापूर ओढ्यालगत नारळाच्या बागा लावून तासगांवला कोकणाचे सौंदर्य दिले.

या शहराभोवती ३०० वर्षापूर्वीची तटभिंत होती. भिलवडी गेट, सोमवार गेट, विटा गेट, सांगली गेट किंवा प्रवेशाद्वारे पुर्वीपासून उल्लेखलेली आहेत.[९] परशुरामभाऊंनी (१७४०—१७९९) या कालावधीतील तासगांवला आधुनिकतेचं रूप दिले. स्थापत्य बांधकाम, चित्रशैली विकसित केली. शेती, व्यापार, उद्योग वाढवून रोजगार वृध्दी केल्याचे दृष्टोपतीस येते. त्यांच्या काळातील बांधकामे.

## १) तासगांवचा ऐतिहासिक राजवाडा

मिरज येथील भुईकोट किल्ला एक आदिलशाही सरदाराने बांधला त्याचप्रमाणे त्याच्याच कारकिर्दीत इ.स. १४५० ला तासगांव येथे तटबंदी व वाडा बांधला आहे.[१०] हा वाडा शहराच्या मध्यभागी असून तेथे अगोदर डुबल सरदार रहात. भाऊसाहेब पटवर्धनांना (१७४०—१७९९) या काळात सरदारकी मिळाल्यानंतर त्यांचे वास्तव्य या वाड्यात राहिले. सवाई माधवरावाच्या मृत्युनंतर (१७९५) पुणे दरबारात अंतस्थ कलहांना ऊत आलेला होता. नाना फडणीस आणि पटवर्धनांनी वैमनस्य उद्‌भवले. अशा परिस्थितीत पटवर्धनांच्या मुखावर हल्ला करण्याचा दुसऱ्या बाजीरावाने कोल्हापूर छत्रपतीला साक्ष दिल्यानुसार कोल्हापूरच्या सैन्याने हल्ला करून पटवर्धनांच्या ताब्यातील तासगांव शहर आणि वाडा जाळून उध्वस्त केला. अंतर्गत संघर्ष मिटल्यानंतर भाऊंनी व चिरंजीव रामचंद्रपंत चंदनी लाकडाचा वापर करून हा वाटा सुरेख बनविला. हा वाडा शहराच्या मध्यभागी असून चौकोनी आकाराचा आहे. (लांबी ३६० मीटर व रूंदी ३६० मीटर आहे) त्याच्या भोवतालचा तट १० मी. रूंद व २० मी. उंच आहे.[१२] सध्या या राजवाड्याची फक्त समोरची व पुर्वेकडील बाजू शिल्लक आहे. या वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार उत्तरेकडील तटाच्या मध्यभागी आहे. आजही हा वाडा तासगांवचे ऐतिहासिक वैभव सिध्द करतो. वाड्याच्या सभोवताली मातीच्या बुरूजासह तट विशेष बांधले होते. वाड्याच्या उत्तरेला दिल्ली दरवाजा म्हणून ओळखले जाते. वाड्याच्या पूर्व अंगास भाऊंनी आपले उपाध्य दैवत श्री गजानन व त्यांचे पंचायत यांचे विशालय देवालय बांधले आहे.

## २) श्री गणेश मंदिराची निर्मिती

भाऊंचे बालपण पुणे येथे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या सांस्कृतीक दृष्ट्या व्युत्पन्न व्यक्तिमत्वाच्या सानिध्यात गेले. धार्मिक व कलात्मक रूढीचा व कलाकृतीचा त्यांच्या संस्कारक्षम मनावर प्रभाव पडणे स्वाभाविक होते.

पटवर्धन घराण्यातील मुळ पुरूष असलेला हरभटबाबांची गणेशभक्ती परंपरागत आली असल्याने परशुरामभाऊ पटवर्धनांनी तासगांव मध्ये गणेश मंदिर उभारले.[१३] उजव्या सोंडेच्या सिध्दी विनायकाच्या पंचायतनाची भाऊंनी प्रतिष्ठापना केली. त्याचे कारण असे की, याला एक तत्कालीन कारणही घडले होते. १७७१ पर्यंत कोणत्याही मोहिमेवर कूच करण्यापुर्वी गणपतीपुळ्याच्या श्रींचे दर्शन घेण्यासाठी मुद्दाम मार्ग वळवून भाऊ पुळे मार्गे समरस्थळी जात असत.

एकदा श्री गणपतींनी भाऊंना स्वप्नात दृष्टांत देऊन सूचना केली की, दरवेळी एवढा त्रास घेऊन पुळ्याला वेढा घालण्यापेक्षा माझीच प्रतिष्ठापना तासगांवी का करीत नाही? भाऊंनी तासगांवी १७७३ ते १७७९ या काळात श्रीगणपती पंचायतन देवस्थापनाची उभारणी केली.

मोहिमामध्ये भाऊंना श्रीरंगपट्टणच्या आसपास मंदिराचे वास्तुशिल्प व विशेषत: त्यांनी गोपूरे यांनी आकर्षित केले होते. दक्षिणेतील देवस्थान त्यांचे नित्य – नैमित्रिक उत्सव, रिवाज, उपासना कार्यक्षमतेने व तन्मयतेने पार पडत असत. फाल्गुन शु।। २ शके १७०६ (इ.स.१७७९) या शुभ दिवशी श्रींची प्रतिष्ठापना भाऊंनी केली. दक्षिणेतील देवस्थानांच्या व्यवस्थापनाची व सामाजिक संरचनेची पूर्ण चिकित्सा व अभ्यास करून त्यांनी हे मंदिर उभारले.[१४]

### श्री गणेश मंदिराची स्थापना - गोपूर

पूर्व – पश्चिम ९० मीटर (३०० फूट) लांब व दक्षिण उत्तर ३२ मीटर (११० फूट) रूंद अशा १.५ मीटर (४ फूटी) जाड तटबंदीने सीमित केलेल्या प्रशस्त आवारात श्रींची प्रतिष्ठापना भाऊंनी केली आहे. पूर्वेकडे महिरपी

कमानीचे भव्य प्रवेशद्वार त्यावर देखणा नगार खाना आहे. लगत पश्चिमेला मंदिराचे प्रवेशद्वार आहे. ३२ x ३२मीटर (११० x १००) फूट असे भव्य प्रांगण आणि त्यालगत पश्चिमेलाच मंदिराचे प्रवेशद्वार आहे. त्यावर ३० मीटर (९६ फुट) उंचीचे कोरीव मुर्ती व नक्षीकाम सजलेले भव्य गोपूर असून त्यापुढे पश्चिमेला मंदिराचे दगडी प्रांगण लागते. त्यात गोपूराजवळच्या उत्तर दक्षिण बाजूला अत्यंत देखण्या दगडी दीपमाळा उभ्या आहेत. चित्रकलेने व रंगलेले शांतवलेला मंदिराचा सभामंडप आणि त्या गाभाऱ्यात मध्यभागी श्री गजानन स्थानापन्न आहेत. त्या सभोवती श्री विष्णू, श्री महादेव, श्री सूर्यनारायण व श्री उमादेवी अशी पंचायतन मूर्ती अशी या मंदिराची मनोरम रचना आहे.[१५] पाचही देवतांच्या गाभाऱ्यावर कळस आहे. त्यांची उंची समोरील उत्तुंग गोपूर शिखरापेक्षा खूपच कमी असल्या तरी ती अचूक व प्रमाणबध्द आहे. श्री महादेव व श्री विष्णू यांच्यासमोर अनुक्रमे नंदी व गरूड यांची छोटी मंदिरे व त्यावर कळस आहेत. १८८८ च्या ब्रिटीश गॅझेटियरच्या खंडात तासगांवच्या गणेशमंदिर व गोपूर बांधकामाची सविस्तर माहिती दिलेली असून स्थापत्य कलेचे सुंदर नमुने म्हणून या दोन्हींची प्रच्छन्न स्तुती केली आहे.

## गोपूराचे वैशिष्ट्ये पूर्ण बांधकाम रचना.

प्रवेशद्वारावरील गोपूरास एकूण सात मजले आहे. आतून भिंतीमधून जिने काढून थेट कळसापर्यंत वर जाण्याची सोय आहे. प्रत्येक मजल्यावर चारही बाजूंना मोकळया खिडक्या आहेत. जस जसे वर जावे तस—तसा अधीकाधिक विस्ताराच्या भूप्रदेशाचा नयनरम्य देखावा या खिडक्यात दिसतो.

एकूण मंदिराचे प्रशस्त आवार उत्कृष्ठ घडी व काळ्या पाषाणाची व पंचायतनातील सर्व देवांना अलग परंतु एकाच मंदिरात समाविष्ट करून घेण्याची वैशिष्टपूर्ण बांधणी व कारंजाची योजना केलेली बाग हे मंदिराचे वैशिष्ट आहे.[१६] हे गोपूर द्रविड वास्तूशिल्प रचनेचे आहे.

## मंदिराची वैशिष्टये

१. मंदिराचा दगड राजस्थानातून आणलेला आहे.

२. चुना व सनला यांच्या मिश्रणात बांधकाम केले आहे.

३. चित्रकला व चित्रकार राजपुताना, राजस्थान येथील होते.

४. महादबा शेटीबा हे प्रमुख गवंडी कर्नाटकातील होते.

५. मंदिर आणि गोपूर यांची रचना श्रीरंगपट्टण येथील मंदिराशी जुळती आहे.

६. मंदिराचे बांधकाम पूर्ण होण्यास (१७७३ ते १७७९) सुमारे सात वर्षे लागली.

७. श्रींची मुर्ती पंचधातूची भरीव असून तिचे वनज १२१ किलोग्रॅम आहे.

८. गोपूरावरील सर्व मूर्ती दक्षिणात्य धर्तीच्या आहेत.

९. सर्व कमानी दगडी असून त्यांची रचना उत्तर हिंदू रचनातील मंदिराप्रमाणे आहे.

१०. सभा मंडपातील खांबाची रचना मदुराई, रामेश्वर अशा दक्षिणात्य मंदिराप्रमाणे आहे. गोपूरावर जाण्यासाठी जिने असून तीन कळस आहेत. परशुराम भाऊंनी या मंदिराचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर तेथे नंदादिप, वैवैद्य, पूजा साहित्य व पुजाऱ्यांचे वेतन हे खर्च चालविण्याकरिता व्यंकटरावांनी सन १७/०१/८२ या वर्षी मिरज प्रांताच्या देशमुखी वतनापैकी निरनिराळ्या गावातील मिळून पन्ना बिघे जमिन देवास इनाम दिली आहे.[१७] हे देवालय फार शोभिवंत व भव्य व्हावे म्हणून भाऊंनी फार दुरदुरचे कारागीर आणले होते. या देवालयात श्री गणपती पंचायतनाची स्थापना शके १७०१ फाल्गुन शु।।२ या दिवशी भाऊंनी सुमुहूर्तावर मोठ्या समारंभाने व थाटामाटाने केली पेशवा दरबारात खटपट करून भाऊंनी या देवस्थानाकरिता दोन हजार रूपयाची जमिन व दोन हजार रूपये वर्षास करून घेतले.

सांगलीच्या गणेशमंदिरापेक्षा सुमारे सेहेचाळीस वर्षे आदि तासगांवचे गणपती मंदिर पूर्ण झाले आहे. मंदिराच्या दर्शन भागातील गवाक्षाची रचना अशी केली आहे की, तेथे उभे राहिले की, संपूर्ण तासगांव शहर व परिसराचे स्पष्ट दर्शन होते. (बर्ड आय व्ह्यू) गणेश चतुर्थीच्या ुसऱ्या दिवशी तासगांवच्या गणेशाची मिरवणूक रथोत्सव निघतो. तीन मजली लाकडी रथात बसून तो आई — वडिलांना भेटण्यास जातो. हजारो लोक त्यात सहभागी होतात. ओरीसातील जगन्नाथपूरीत रथाची आठवण होते.[१८]

## श्री गणेशाचा रथोत्सव सामाजिक ऐक्याचे प्रतिक

तासगांव येथील श्री गणपती पंचायतन देवस्थानाचा गणपती केवळ दीड दिवसाचा असतो. गणपती विसर्जनाची मिरवणूक रथातून काढली जाते.[१९] या रथोत्सवासाठी १७८५ ला तीन मजली सागवानी लाकडाचा रथ तयार करण्यात आला. या रथोत्सवाचे वैशिष्ट्ये म्हणजे २४१ वर्षे अव्याहतपणे दरवर्षी भाद्रपत शुध्द प्रतिपदेला श्रींचा उत्सव सुरू होतो. तो भाद्रपत शुध्द पंचमी असा पाच दिवस साजरा केला जातो. या काळात दररोज दुपारी बारा वाजता ट्रस्टच्या वतीने महापूजा, सायंकाळी सहा वाजता श्रींचा छबीना रात्री मंदिरात किर्तन आणि प्रवचन होते.

सिध्दी विनायकाच्या मंदिरासमोर साधारण एक कि.मी. अंतरावर विश्वेश्वराचे मंदिर असून श्री गणेश आपल्या आई वडिलांना व बंधू कार्तिक स्वामींना भेटण्यास रथातून जातो. ही मूर्ती पंचधातूची १२१ किलोग्रॅम वजनाची आहे. हा रथ केळीचे खुंट, पाना फुलांनी अत्यंत देखणा सजविला जातो. हजारो भावीक हा रथ भक्ती भावाने ओढतात या रथात बसण्याचा मान परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या वंशजांना व त्यांनी या मंदिराच्या नैवद्य नैवैद्य, व्यवस्थेसाठी ज्यांना इनाम दिली आहेत त्यापैकी २३ जणांना असून ते विविध जातीतील जमातीचे मानकरी म्हणून प्रतिनिधीत्व करतात.

हा रथ गणपती बाप्पा मोरयांकरीत गुलाल खोबऱ्याची उधळण करीत निघतो. दुपारी एक वाजता मिरवणूक निघते. दक्षिण भारतातील हा त्या काळातला सार्वजनिक स्वरूपात जातीभेद, पंथ, धर्म विसरून एकोप्याने संपन्न केला जाणारा शाही रथोत्सव असून लो.टिळकांच्या सार्वजनिक गणोशोत्सव अगोदर १०६ वर्षे तासगांव संस्थानाने भाऊंच्या नेतृत्वाने हा उत्सव सुरू केला.[२०]

या रथचे अचूक दिशा — दर्शन व संचालन वडार समाजांचे मानकरी आजही करतात. ३८० पुरणपोळ्याचा प्रसाद. एवढा नाममात्र मानधनात ते स्वत:ला आनंदाने झोकून देतात. त्यामध्ये गाडी वडार व माती वडार असे दोन समुह असतात. लाकडाचे ओंडके व तरफा यांच्या सहाय्याने या रथचे अचूक नियोजन केले जाते. या पालखीचा दोर करण्याचा लक्ष्मणराव भोई (शिंदे) यांच्या घराण्याकडे असून गेली २४१ वर्षे हे काम त्यांच्या पिढ्या निष्ठेने करतात.

या रथोत्सवाचे वैशिष्टये म्हणजे राजेशाही रथोत्सवाची परंपरा आजही तेवढयाच तन्मयतेने जपला आहे. राजेंद्र पटवर्धन सध्याचे वारसदार आहेत.

''गणपती संस्थान असे मला कुठे कुठे दावा''

हा पोवाडा गेली साठहून अधिक वर्षे सादर करणारे गोंधळी भाऊंचा पोवाडा तासगांव करांना ऐकवतात. या रथासमोर हत्ती, घोडे जरीपटका, वाद्ये, गोंधळी श्रींचा छबीना असतो. सध्या या रथोत्सवाची शासकीय पातळीवरून रथोत्सव शाही थाटात संपन्न होताना शांतता व सुव्यवसथा रहावी म्हणून खबरदारी घेतली जाते.

सध्या या रथोत्सवाला आधुनिकतेची झालर आली असून झांजपथक, बॅंड असतो. युवा वर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन लाखो जनसमुदायाच्या प्रचंड गर्दीतही मानवी मनोरे तयार करण्याची स्पर्धा तासगांवातील विविध मंडळात लागलेली असते. ''गणपती बाप्पा, मोरया मोरया'' या घोषणांनी गुलालाची मुक्त उधळण करीत, 'दिवाणजी खोबरं' या घोषणा आसमंतात भरून जातील एवढया उत्साहात केल्या जातात. रथ जस—जसा पुढे जाईल तसे रथातून खोबरे,

पेढे यांची उधळण लोकांना प्रसाद म्हणून केली जाते. हा रथ साधारणत: तीनच्या आसपास काशी विश्वेश्वर मंदिरासमोर जातो. तेथे छबिण्यातून गणपतीची आई—वडिलांशी भेट होती आणि रथाचा परतीचा प्रवास सुरू होतो.

तासगांवचा उजव्या सोंडेचा गणपती म्हणजे नवसाला पावणारा गणपती अशी देशभर ख्याती आहे. त्यामुळे पुणे, मुंबई, कोकण विदेशातील व्यक्तीही या रथोत्सवासाठी येतात. राज्य शासनाचे मंत्री, प्रतिनिधी भागाचे प्रतिनिधित्व करणारे नेते, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्त्यांची मोठी गर्दी असते. या रथोत्सवाच्या सांगता कार्यक्रमात मंदिराचे रथोत्सवाचे जे विविध समाजातील मानकरी आहेत त्यांचा सन्मान येथे केला जातो. वेदशास्त्र निपुण पुजारी, घिसाडी, गोंधळी, किर्तनकार, गायक, नगारावादक, गुरव श्रींना शिधा पोहचविण्याची जबाबदारी त्याकाळी सोपविलेले शेटे, पैलवान, हिंगमिरे यांच्या वंशजांचा तसेच माती वडार, गाडीवडार, यांत्रिकी बहुविध कलाकार, शाहिर यांनाही सन्मातीन केले जाते. आज या मानकऱ्यांची सातवी—आठवी पिढी असून पटवर्धनांनी धार्मिक उत्सवातून त्यांना सन्मानीत करून जपलेल्या सामाजिक समतोल ते आजही मानवंदना देतात.[२१]

## हिंदू मुस्लीम ऐक्याचे दर्शन -

परशुरामभाऊ हे केवळ मराठ्यांचे दक्षिण मोहिमांचे सेनापती नव्हते तर द्रष्टे समाजहितकारक सामाजिक समता निर्माण करणारे मानवतावादी दृष्टीकोन जपणारे उत्तम प्रशासकही होते.

सर परशुरामभाऊंच्या या राजेशाही वाड्याच्या दक्षिण बाजूस मुस्लीम साहेबांच्या पिरासाहेबांचे देवस्थान असून दर तीन वर्षांनी त्याच्या कंदुरी प्रसादाचा कार्यक्रम श्रीमंत पटवर्धनाकडून आजही केला जातो. त्यावेळी मुस्लीम मौलवी फकीर इतर मानक ही उपस्थित राहतात. मिरजेच्याही जुन्या पटवर्धन राजवाड्यात पिरासाहेबांचे देवस्थान आहे. त्यामुळे पिरासाहेब हे हिंदू — मुस्लीम ऐक्याचे

प्रतिक ठरले. तासगावच्या राजवाड्याचे पीरासाहेब हे रक्षक आहेत. त्यांना 'फाते वंदना देणारे वासी बाबुराव मुर्सल हे श्री गणेशाचे नगारजी होते. शिवाय श्रींचे कपडे सुध्दा ते शिवत. त्यांचे थोरले भाऊ फरीद मुर्सल हे ही नगारा क्लैरिनेट व सनई वादनात निपुण होते. आजही ताबुतांच्या भेटीचा कार्यक्रम राजवाड्यात होतो.[२२]

## कला, चित्रकलेला आश्रय

तासगांव शहराच्या मध्यभागी असलेला भव्यदिव्य राजवाडा त्याकाळी सर परशुरामभाऊ पटवर्धनांच्या राजकीय प्रभुत्वाची छाप जशी स्पष्ट करीत होता. तशी त्यांची कलात्मक दृष्टी व कलावंतांना सन्मानीत करणारा राजवाडा ठरला आहे. वाड्याला चारी बाजूना बुरूज, तटबंदी, प्रवेशद्वारे होती. आजही उत्तरेकडची भव्यकमान पटवर्धनांचे प्रवेशद्वार आहे. त्याला सागवानी लाकडाचा दरवाजा असून उत्कृष्ट घडी व बांधकामाची कमान आहे. या राजवाड्याचा तट ५०० फूट x ५०० फूट असा होता. पंचवीस फुट उंचीचा पांढरमातीचा पठारी प्रदेश निर्माण करून त्यावर वाड्याचे बांधकाम केले आहे. वाड्याला दोन मजले असून त्यावर शिखर म्हणून बारदारी (वहिनी बाईचा) वाडा, तिसरा मजला आहे. तयावर अवलोकन गच्ची चौथा मजला आहे.

## चित्रकला व काष्ठा शिल्पे -

राजवाड्यातील दुसऱ्या मजल्यावर सुरूच्या नक्षीदार खांबाचा दिवाणखाना, त्या समोरचा धाकटा दिवाणखाना व तयालगत आरसे महाल आहे. आरसे महालामध्ये इ.स. १७८० च्या सुमारास अस्सल राजपुतांना शैलीतील अप्रतिम चितारलेली रंगीत चित्रे आहेत. 'विविध देवता, राग रागिनी, तिर्थक्षेत्रे यांची ही चित्रे इंप्रेशनिष्ट आर्ट' या कलाप्रकारातील आहेत. त्या चित्रकाराच्या अंतर्मनावर महाबळेश्वरची जी प्रतिमा उमटली होती तिचे ते चित्रण आहे. या चित्रातील सूक्ष्म

कलाकुसर, नक्षीकाम, वनस्पती जन्य रंग, रंगविलास व रंगसंगती कल्पनांचे वैविध्य व विलास, मानवी आकृती चेहऱ्यावरील भाव चित्तवेधक आहेत.

गणपती मंदिराचे बांधकाम पहाता हा दगड राजस्थानमधून आणला असून त्या दगडावर उत्कृष्ठ असे पानाफुलांची नक्षी मंदिरातील खांबावर कोरलेली आहे. दगडावरील नक्षीकाम उत्कृष्ठ स्थापत्य शैलीचा नमुना आहे. सातमजली जे गोपूर आहे त्यावर असलेच्या विविध देवतांची मूर्ती पहाता अत्यंत नाजूक, कलात्मकतेचे दर्शन घडवितात. छतावरील नक्षीकाम, खांबावरील नक्षीकाम मन वेधून घेणारे असून गणेशाचे निद्रागृह जाळीदार नक्षीकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. मुख्य गाभाऱ्यात जी मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. तिची निर्मिती, गणेशाचे सिंहासन कलाकाराच्या दृष्टीला सलाम करावा असे अत्यंत नाजूक देखणे आहे. मंदिराची शिखरे विलोभनीय असून दक्षिण भारतात शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असल्याचे मत अनेकांना नोंदविलेले आहे.[२३] संस्थानातील या कलाकारांना परशुराम भाऊ मोठी बिदागी देत सन्मान करीत.

## कलावंतिणीचा बुरूज

भाऊंच्या वाड्याला चार चौक, सहा बुरूज व तीन दरवाजे होते. त्यापैकी दक्षिणेचा बुरूज हा कलावंतिणीचा बुरूज म्हणून प्रसिध्द होता. भाद्रपत उत्सवामध्ये तिला श्रीमंतांकडून खास पालखी पाठवून आदराने बोलावले जाई. दक्षिण दरवाजामधून ती प्रवेश करीत असे. तिच्या नृत्य संगिताचा कार्यक्रम दिवाणखाण्यात होत असे अशा कलासक्त भाऊंचा वारसा त्यांच्या पिढयांनी १९१५ पर्यंत सुरू ठेवला होता.[२४]

## संगितकार व पुरोहितांना आश्रय व इनामे, वर्षासने

सर परशुरामभाऊ हे कलेचे आणि विद्येचे व्यासंगी होते. त्यांना शास्त्रीय संगिताची आवड होती. ते कलेचे साधकही होते. तासगांवचे जनजीवन आणि श्री गणेशाचे स्थान अध्यामात आणि भक्तीरसात न्हाऊन जावे यासाठी ते राजवाड्यात आणि गणेशमंदिरात संगित सोहळा, किर्तने, प्रवचन ठेवीत ही परंपरा आजही राजेंद्र पटवर्धन जोपत आहेत. भाऊंनी त्याचा उपयोग संस्थानात सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक चळवळ वाढविण्यासाठी केला. देशावरून वेदशास्त्र संपन्न पुजारी, गोंधळी, किर्तनकार, गायक, नगारवादक, गुरव आणले त्यांना बिदागी दिल्या. चरितार्थासाठी जमिनी इनाम दिल्या. गणेश उत्सवाचे मानकरी बनवले. त्यांचे वंशज सदाशिव नारायण काळे दिपक पांडूरंग जोशी, अनंत जोशी, राजोपाध्याय, रामचंद्र जोशी मंदिरात पूजा विधी करत आहेत. अनंत जोशी यांचे शास्त्रीय संगित वारवाणण्यासारखे आहे.[२५] या सर्वांना भाऊंनी जमिनी इनामे दिल्या असून बिदागीही देत असत.

## व्यापारी व साहुकारास आश्रय - व्यापाऱ्यास इनामे

साहुकार म्हणजे राज्याची व राजेश्रींची शोभा साहुकाराच्या योगाने राज्य अवाधन होते न मिळे त्या वस्तुजात राज्यात येतात व ते राज्य श्रीमंत होते. पडले संकट प्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते. जेणेकरून आले संकट परिहार होते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुल फायदा आहे. याकरिता साहुकाराचा बहुमान चालवावा. कोणाविषयी त्याजवर जलाल अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा पेठात दुकाने वखार घालून हत्ती, घोडे, जरमिना पशमी आदिकरून वस्त्रजात रत्ने शस्त्रे आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उद्‌दीम चालवावा. हुजूर बाजारामध्ये थोर थोर साहुकार आणून ठेवावे वर्ष संबंधे तसेच लग्नादी महोत्सवी त्यांचे त्याचे योग्य ते नुरूप प्रतिष्ठछेने बोलावून वस्त्रपान देऊन समाधान करीत जावे. परमुलखी जे जे साहुकार असतील त्यांची समाधाने करून त्यास अनुकूल

न पडेच तर असतील तेथेच त्यांचे समाधान रक्षुन आपली माया लावून त्यांचे मुलालीक आणवून त्यास अनुकूल जाय देऊन ठेवावा.[२६] ही निती सर परशुरामभाऊंनी अंमलात आणली.

पेशवेकालीन साहुकार गाडगीळ, चिपळूनकर, रास्ते, लेले, तुळशीागवाले, जोग, असे जे साहुकार होते त्यांच्याशी भाऊंचे संबंध चांगले होते.

परशुरामभाऊंच्या संस्थानात नवकोट नारायण हुपरीकर हे सर्वात मोठे साहुकार होत. जोग, राजोपाध्याय, गोसावी या साहुकारांना भाऊंनी पुणे परगाण्याहून आणवले. तसेच भाऊंच्या संस्थानानजीक सोमवार गेट जवळ जी बाबरवाडी होती ती तासगांवच्या विस्तारास घेऊन तेथील साहुकार गोविंद बुवाजी कोळेकर याला सन्मानीत केले ते तासगांव परगाण्यातील तीन नंबरचे साहुकार होते.[२७]

श्रींना शिधा पुरविण्याची जबाबदारी त्याकाळी सोपविलेले शेटे, पैलवान, हिंगमिरे, आडके यांना व्यापारी पेठेत साहय केले. सोमवार पेठ व गणपती पेठ वसवली. आज त्यांचे वंशज तासगांवच्या मार्केट यार्डचे व आर्थिक व्यवहाराचे अध्वर्यु आहेत. या परगाण्यातून एके कापूस, तंबाखू, कांदा, शाळू, ज्वारी, भुईमूग, मिरचीचा व्यापार सातारा, सोलापूर, पुणे, चिपळून या ठिकाणी होत असे. शेतमाल, कापड, मीठ यांची ने—आण होत असे.[२८] व्यापार उद्‌दीम व्यवहारात सर्व जातीजमातींना भाऊंनी संधी दिली. सर्व व्यापाऱ्यांना भाऊंनी जमिनी इनाम दिल्या. संस्थानात ५००० एकर इनामी जागा शेती होती / आहे.

## शेती सुधारणा व महसूल - पेशवाई पध्दत

शेती हे महसूलांचे मुख्य साधन असल्याने परशुरामभाऊंनी उत्तम, मध्यम, साधारण, जिरायत व बागायत पाटस्थळे, मोटस्थल असे वर्गीकरण केले होते. जिरायत जमिनीसाठी प्रत्येक बिग्यासाठी दोन रूपये आकारणी केली होती. दुय्यम जमिनीसाठी प्रत्येक बिघ्यास दीड रूपया आणि सिम जमिनीसाठी एक

रूपया आकारण्यात येत असे. सारा देताना लोक धान्याच्या रूपाने सारा भरत कारण त्यावेळी पैशाचे व्यवहार फार कमी प्रमाणात चालत.[२९]

पेशव्यांच्या काळात महसूलाचा कारभार वाटा बलुतेदाराच्या समवेत पाटील चालवित असे. त्याच्या मदतीस असे चौगुला हा कुलकर्ण्यांच्या दप्तराची काळजी घेत असे.[३०] भाऊ याच प्रथेनुसारच महसुल गोळा करीत विशेष म्हणजे जे मोठे शेतकरी होते ते काही वेळा एखाद्या गरीब व्यक्तीस जमीनदान करीत भाऊ त्या शेतकऱ्याचा सन्मान करून फेटा बांधत व निशाण देत.[३१]

परशुराम भाऊंनी श्री गणेशाच्या मानकऱ्यांना व स्थलांतरीत व्यापारी यांना आपल्या परगाण्यातील पाच हजार एकर जमिन कसण्याला दिली होती. त्या रक्कमेतून ते स्वत: चरितार्थ चालवण्याबरोबरच उरलेल्या रक्कमेतून करवा खंड म्हणून संस्थानात देत. त्याकाळी एक रूपयाला सोळा शेर धान्य मिळत असे.

भाऊंना पेशवे दरबाराचे १४०० घौडदळ व सैन्याची मनसब दिली होती. त्यासाठी सध्याची पागा गल्ली येथे पागा उभारली होती. त्याचा खर्च पेशवे दरबार करीत. बाकीचा खर्च व उत्पन्न याची जबाबदारी भाऊंच्यावर होती. एकंदरीत पहाता परशुरामभाऊ पटवर्धनांनी धार्मिकतेतून सामाजिक एकता जपत. राज्याची आर्थिक घडीही व्यवस्थित बसविली होती हे पेशवे दप्तरावरून दिसते.

# संदर्भसूची


१. चिंतामणी सहस्त्रबुध्दे — सांगली जिल्हा इतिहासाची सुवर्णपाने आदित्य प्रकाशन सांगली २०१३ किंमत २०० रू. पृष्ठ

२. सतीश लिंबळे — तरूण भारत रथोत्सव पुरवणी सांगली १४ सप्टें. २०१८

३. मो. के. कुंटे — सांगली जिल्ह्यातील मंदिरे — डॅ.गणेश प्रकाशन पुणे. १९०८ पृष्ठ—२

४. चिंतामणी सहस्त्रबुध्दे — सांगली जिल्हा इतिहासाची सुवर्णपाने— आदित्यप्रकाशन सांगली २०१३ पृष्ठ २२

५. स.अ. सहस्त्रबुध्दे — सरदार परशुरामभाऊ पटवर्धन पृष्ठ ४३०

६. डेव्हलपमेंट प्लॅन बुक क्रांती वैभव प्रकाशन कोल्हापूर १९८६ पृष्ठ—२५

७. वासुदेवशास्त्री खरे ऐतिहासिक लेख संग्रह खंड ९ पृष्ठ २७९४

८. राजेंद्र पटवर्धन मुलाखत ३० जुन २०१५

९. चिंतामणी सहस्त्रबुध्दे — सांगली जिल्हा इतिहासाची सुवर्णपाने, आदित्य प्रकाशन सांगली २०१३ पृष्ठ २१

१०. आपटे गो.वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास पृष्ठ २०१६

११. कि.का. चौधरी — महाराष्ट्र गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा संपादक १९८९ पृष्ठ ६३

१२. आपटे गो.वि पटवर्धन घराण्याचा इतिहास पृष्ठ २१६

१३. तरूण भारत — कले.इतिहास चॅम्पियन १८ नोव्हेंबर २०१७ पृष्ठ ३

१४. तासगांव फेस्टिवल २०१७ रोटरी क्लब ऑफ तासगांव राजेंद्र पटवर्धन पृष्ठ २

१५. तासगांव फेस्टिवल २०१७ रोटरी क्लब ऑफ तासगांव

१६. मराठा काळातील ऐतिहासिक स्थल दर्शन पृष्ठ २५

१७. इचलकरंजी संस्थानाचा इतिहास वा.वा. खरे पृष्ठ १३०

१८. चिंतामणी सहस्त्रबुध्दे — सांगली जिल्हा इतिहासाची सुवर्णपाने २०१३ पृष्ठ २
१९. ज्ञानदर्शन एज्युकेशन वार्ता २६ ऑगस्ट २०१७ पृष्ठ १
२०. प्रा.जी.के.पाटील — तरूण भारत पुरवणी शाही रथोत्सव तासगांव लेख १४ सप्टेंबर २०१८
२१. तासगांव फेस्टिवल २०१७ रोटरीक्लब पान २०
२२. राजेंद्र पटवर्धन मनासारखा राजा आणि राजासारखे मन लेख पृष्ठ २४
२३. राजेंद्र पटवर्धन मनासारखा राजा आणि राजासारखे मन लेख पृष्ठ २४
२४. राजेंद्र पटवर्धन मनसारखा राजा आणि राजासारखे मन लेख पृष्ठ २४
२५. राजेंद्र पटवर्धन — मुलाखत
२६. अ.रा. कुलकर्णी — मराठयाचा इतिहास डायमंड पब्लिकेशन पुणे — पान १६६
२७. रामचंद्र विठ्ठल कोळेकर मुलाखत
२८. चिंतामणी सहस्त्रबुध्दे इतिहासाची सुवर्णपाने मार्च २०१३ पृष्ठ २१
२९. संकपाळ एस.डी — दि. पटवर्धन ऑफ तासगांव — १९८९ पृष्ठ ८७
३०. एल्फीस्टन एम. टेरोटरीज कॉनक्युरड फ्रॉम द पेशवा अ रिपोर्ट पब्लीशर दिल्ली.१९७३ पृष्ठ २७
३१. कृष्णा रावजी पाटील मुलाखत २०१४.

# प्रकरण ५

# अभिप्राय

## धार्मिकतेतून सामाजिक ऐक्य साधलेले मुलखावेगळे संस्थान - तासगांव

## प्रस्तावना

## संस्थानातील मंदिरे स्थापत्यकला, वर्षासने, इनामे

| | |
|---|---|
| १ | काशी विश्वेश्वर मंदिर — गणपती पेठ |
| २ | विष्णू मंदिर |
| ३ | विठ्ठल मंदिर |
| ४ | श्री सिध्देश्वर मंदिर |
| ५ | श्री हाटकेश्वर मंदिर |
| ६ | श्री विऱ्हाडसिध्द मंदिर — कवठेएकंद |
| ७ | श्री महादेव मंदिर, मांजर्डे |
| ८ | भिलवडी घाट, भिलवडी |
| ९ | पट्टणकुडी, सर परशुरामभाऊ पटवर्धन समाधी |
| १० | स्वतंत्र भारताच्या जडणघडणीतील श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन यांचे योगदान. |
| ११ | संदर्भ सूची |

# संस्थानातील मंदिरे व स्थापत्यकला वर्षासने, इनामे

## प्रस्तावना -

सर परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तासगांव येथे श्री सिध्दीविनायकाचे मंदिर उभारून, रथोत्सवाच्या माध्यमातून आपल्या धार्मिक कार्यातून सामाजिक परिवर्तनाची जी मशाल पेटवली तिला महाराष्ट्राच्या इतिहासात अनन्य साधारण महत्व आहे. एक ध्येयवेडा, ध्येयवादी सरदार आपल्या पराक्रमाच्या जोरावर दक्षिणेच्या राजकारणावर जसा प्रभाव प्रस्तापित करतो शिवाय जो—जो प्रदेश पहिला आणि ज्यात नाविण्य दिसले ते टिपले आणि संस्कृती म्हणून जोपासले. संस्थानात सामाजिक, सांस्कृतिक ऐक्य निर्माण करण्यासाठी वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान ही प्रजेत यात्रांच्या माध्यमातून रूझवून समतेच्या बीजांचे बीजारोपन केले. त्यासाठी धर्म ही साधना वापरली आणि मंदिरे ही अध्यात्माची स्थाने बनली. त्यासाठी कीर्तनकार, गायक, वादक, लोकसंगीतकार अशा कलावंतांना संस्थानात आश्रय देऊन बिदागी दिली.

सैन्यव्यवस्था राज्य रक्षणासाठी वापरली तर मंदिरे आणि संगित साधना प्रजेला ईश्वरावर निष्ठा ठेवून जगण्याची प्रेरणा देणारी बलस्थाने केली. या मराठेशाहीतील पेशवाईच्या उत्तरार्धात नवी मंदिरे उभारताना जुन्या मंदिराचा जीर्णोध्दार केला. त्या देवतांना नैवैद्यासाठी, पूजा अर्चासाठी इनामे दिली. सातारहून गुरव मंडळींना बोलावून पूजारी बनवले आणि समाजात ईश्वर भक्तीचे मळे फुलविले. हीच ईश्वरभक्ती मराठी राज्याची संस्थानाची देशभक्ती ठरली. १७४० ते १७९९ या काळात भाऊंनी श्री सिध्दीविनायक मंदिराबरोबर पुढील मंदिरे उभारली व काही मंदिरांचा जीर्णोध्दारही केला.

## काशी विश्वेश्वर मंदिर गणपती पेठ -

हे मंदिर भाऊंनी श्री सिध्दीविनायकाच्या सरळ रेषेत मंदिराच्या समोरच एक कि.मी. वर उभारले आहे. हे पश्चिमाभिमुख व पण शिवपिंडी उत्तराभिमुख असलेले मंदिर आहे. तटबंदी मोकळे आवार त्यात घडीव दगडी फरशी, नंदीची घुमटी नंतर मध्ये अंतर सोडून तीन फुटावर अर्धा मंडप, चौकोनी खांब कमानी असून १० x १० च्या गाभाऱ्यात शिवपिंडी जमिनी लगत असून देवाकडे तोंड करून असलेल्या कोनाड्यात कार्तिक स्वामीची मुर्ती आहे. अर्ध मंडपात शंकराच्या मांडीवर गणपती पार्वतीच्या मुर्ती आहेत. भाद्रपत शुध्द प्रतिपदेला रथोत्सवादिवशी श्री गणेश आई — वडिलांना भेटावयास येतात आजही नित्यनियमे सायंकाळी सहा वाजता सनई वाद्यांच्या गजरात छबीना निघतो.[१]

## विष्णू मंदिर -

या मंदिराची स्थापना सर परशुराम भाऊंच्या लष्करातील सोबती कुटूंबने केली असून लक्ष्मी — नारायणाच्या सुट्या मुर्ती, गदा, कमळ, शंख, चक्र अशी आयुधे असलेले मंदिर आहे.[२] सध्या ब्राम्हण सभेचे विश्वस्त सध्या त्याचे कामकाज पहातात. लग्न कार्यासाठी मंडपाचा वापर सर्व जाती जमातीत केला जातो. गणपती मंदिर संस्थानाचे पुजारी अनंत शास्त्री जोशी सद्या या मंदिरात नित्यनियमे पूजा अर्चा करतात.

## विठ्ठल मंदिर

तासगांव संस्थानाचे अधिपती सर परशुरामभाऊ पटवर्धन येण्यापुर्वी हे मंदिर बाबरवाडी परिसरात होते. त्या अगोदरच्या तासगांवची सिमा रेषा सोमवार गेट पर्यंत होती. या वाडीत दाणेगल्ली, शिंपी गल्ली, कोष्टी गल्ली अशा तीन गल्ल्या होत्या. येथील विठ्ठल मंदिराचे बांधकाम संत नामदेवांच्या प्रेरणेने झाले.

अशी अख्यायिका आहे. कारण कवठेएकंद येथे बिराडसिध्द मंदिराच्या कठड्यावरील संत नामदेवांचे झालेले किर्तन आणि विठ्ठल मंदिराच्या स्थापनेचा कालावधी एकच आहे.[३] या मंदिराच्या भिंतीवर विविध तैलचित्रे आहेत. लाकडी छत असलेला सभामंडप ६ x ६ चा गाभारा चौथऱ्यावर विठ्ठल रखूमाईच्या अडीच फूट उंचीच्या मूर्ती आहेत. या मंदिराला नैवद्य व खर्चासाठी सहा एकर जमिन पटवर्धनांनी दिली आहे. लाकडी रथही असून तो फाल्गुन शुध्द प्रतिपदेला ओढतात. या परिसरात असणारा तेली, कोष्टी, वाणी, शिंपी समाज एकसंघतेने राहतात. परशुराम भाऊंनी सामाजिक ऐक्यासाठी केलेहा हा यशाचा भाग आहे. येथे संस्थांना तीन नंबरचे साहुकार गोविंद बुवाजी कोळेकर रहात. या मंदिरातील विठ्ठल मुर्ती व पंढरपूरच्या विठ्ठल रूक्मिणीच्या मुर्ती सारख्याच वाटतात.

## श्री सिध्देवर मंदिर

तासगांवचे ग्रामदैवत सिध्देश्वर असून श्री सिध्दनाथ खरसुंडी हे त्यांचे मुलस्थान आहे. पटवर्धन कालीन पाटील यांना मानकरी म्हणून सन्मान असून मानाची तलवार ही पटवर्धनांनी त्यांना दिली आहे. गणपती मंदिरातील दीपमाळे प्रमाणेत याही मंदिराला दिपमाळ बांधली आहे. सिध्देश्वर गाभाऱ्यापुढील मंडपात दुमजली सभामंडप असून या मंदिरात बहुतांशी लाकडाचा अधिक वापर केला आहे. लाकडी खांबावर आधारीत हे मंदिर असून तासगांव शहराच्या मध्यभागी असून सर परशुरामभाऊ पटवर्धन व आजचे त्यांचे वंशज याच मंदिराच्या रस्त्यावरून गणेश मंदिराकडे जातात. भाऊंनी या मंदिराच्या नैमतिक पुजेसाठी सातारहून गुरव मंडळी आणली. आजही त्यांचे वंशज या सिध्दनाथाची नित्यनियमित पूजा करतात. मार्च महिण्यात मोठी यात्रा येथे भरते.[४] वर्षात दोन यात्रा संपन्न करणारे तासगांव एकमेव संस्था असावे.

## श्री हाटकेश्वर मंदिर

सर परशुरामभाऊ पटवर्धनांच्या अगोदरचे हे मंदिर असून हे हेमाडपंती बांधकामाचे मंदिर आहे. ते रस्त्यापासून आठ ते दहा फुट उंचीवर आहे. मंदिरात जाण्यासाठी पुर्वाभिमुख उंच उंच पायऱ्या असणारे प्रवेशद्वार असून त्या प्रवेशद्वारावरच नगारखाना आहे. या मंदिरास पूर्ण तटबंदी आहे. आवारात दोन दीपमाळा, नंदीची घुमटानंतर सागवानी लाकडी सहा खांबर आधारीत प्रत्येक दोन खांबात कमानी असलेला २० x २० चा सभामंडप आहे. खांबावर नर्तीकेची चित्रे काढलेली आहेत. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वार अखंड एका दगडातील असून त्यावर कोरीव काम आहे.

गणेशपट्टीचे वर भगवान शंकर तप करीत आहेत. दोन्ही बाजूंना दोन सेवकांचे चित्र आहे.[५] तासगांवच्या मंदिर स्थापनेच्या इतिहासाचा पाया हे मंदिर असावे. श्रीधर महादेव गुरव हे पिढीजात पुजारी पूजा नित्यनियमे करतात. या मंदिराचा जीर्णोध्दार सर परशुरामभाऊंनी करून नैवद्य खर्चाची व पूजाऱ्यांच्या वर्षासनाची तरतुद केली होती.

या मंदिराबाबत एक दंतकथा सांगितली जाते. तास नावाचा दैत्य होता. त्याला पाताळातील देव हाटकेश्वराने हाटकून हाटकून मारले. ज्याठिकाणी हा दैत्य मेला तेथे त्याचे मंदिर बांधले. म्हणून त्याला हटकेश्वर म्हणतात. आणि तास दैत्यावरून तासगांव नांव पडले.

## श्री बिराडसिध्द मंदिर कवठेएकंद -

हे एक जागृत देवस्था असून महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या असंख्य भाविकांचे कुलदैवत म्हणून त्याची आजही आराधना होते आहे. हे स्थान आदिसिध्द श्रीकपील महामुनीची समाधी आहे. चारी बाजूंना तटबंदी व प्रत्येक कोपऱ्यात एक बुरूज आहे. हे मंदिर एखादा ऐतिहासिक

किल्ला किंवा गढीवारावी इतके भक्कम आहे. हे मंदिर घडीव अशा दगडी चिऱ्यांनी बांधले आहे. साधारणत: हे मंदिर २५०० ते २७०० इतके पुरातन असावे. व्यासापर्यंत जाऊन पोहोचणारे काही संदर्भ तर या मंदिराचे पुरातनत्व महाभारत काळापर्यंत नेतात. मंदिराचे उत्तरेकडील प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. दोन्ही बाजूस दोन देवड्या आहेत. आजही येथे दिवसातून चार वेळा नगारखाना वाजविला जातो. या मंदिराच्या कठड्यावर संत नामदेवांचे किर्तन झाले त्यानंतर त्यांनी विठ्ठल रूक्मिणीच्या मुर्ती दिल्या येथील शिवपिंडीखालील श्री सिध्देश्वराचे समाधिस्थान आहे. येथे दसऱ्याच्या दिवशी दारूची आतषबाजी होते. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारा हा उत्सव आहे. सर परशुरामभाऊ पटवर्धन हे श्रीरंगपट्टण येथे युध्दासाठी निघाले असता. श्री सिध्देश्वराचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने मंदिरात आले त्यावेळी त्यांच्या कमरेची तलवार गळून पडलेली प्रचंड वजनाची 'दुधारी खांडा तलवार' ही गाभाऱ्यात एका कोपऱ्यात ठेवली आहे.[७] सर परशुरामभाऊंचे येथे नेहमी दर्शणास येणे असे.

## महादेव मंदिर मांजर्डे -

गावच्या मध्यभागी पूर्वाभिमुख हे हेमाडपंथी मंदिर आहे. याला चारी बाजूनी उंच चौथरा लाभला आहे. यातील कलाकुसर बौध्द धर्मिय छटांची आहे. याला अजस्त्र काळे घोटीव दगड वापरले आहेत. आतील खांब पूर्ण एकाच दगडात असन विविध आकार आकृत्यांनी युक्त आहेत. सर्वसामान्य लोक या 'कलबाचे देऊळ' म्हणतात. सर परशुरामभाऊंच्या इलाख्यात हे गाव असून भाऊंचे या परिसरावर अत्यंत लक्ष असे त्यांचे अधिकारी महसूलासाठी येत. मंदिराला वर्षासन दिले होते.[८]

## भिलवडी घाट -

परशुराम भाऊंचे सांस्कृतीक भान फार मोठे होते. त्यांनी भिलवडी येथे कृष्णा नदीवर नितांत सुंदर अशा दगडी घाटाची बांधणी केली. हा घाट

वास्तुशिल्पाचा उत्कृष्ठ नमुना आहे. कृष्णेच्या उगमापासून असा घाट असल्याचे आढळत नाही. या घाटाचा इतिहास अत्यंत रंजक आहे. परशुरामभाऊ दक्षिण मोहिमेवर असताना एकदा विजापूरला मुक्काम पडला होता तेथे एक भग्न दुर्लक्षित अशी त्यांना प्रचंड मोठी मशिद दिसली.

प्रार्थना स्थळ म्हणून तिचा वापर होत नाही. याची खात्री पटल्यावर भाऊंनी या मशिदीचा सगळा दगड थेट भिलवडीला पाठविला. विजापूर ते भिलवडी १५० कि.मी. अंतर एवढा दगड पोहचणे हे राक्षसी काम होते.[९]

भिलवडी घाट पूर्ण दगडी बांधकामाचा असून या घाटाची लांबी ४२५ फुट आहे. एकशे दोन फुट रूंद आहे. दोन्ही बाजुला चार फुट व्यासाची चौदा बुरूज आहेत. बेचाळीस पायऱ्या आहेत. गावाकडील बाजूस दगडी ओवरी आहे.

ओवरीच्या पाठीमागील बाजूस घाटाच्या मध्यभागातून समांतर असे भुयार आहे. त्यातून महिला नदीपात्रात जात असत. नदीपात्रातील मध्यभागी महिलांच्या स्नानासाठी कुंडे होती. कुंडाच्या खोलगट भागात घोडे, जनावरे यांचे पाय अडकून अपघात होऊ लागल्याने कालांतराने तेथे अष्टकोटी मंदिर बांधण्यात आले. त्यामध्ये शंकराची पिंड आहे.

घाटाच्या आणखी वैशिष्ट्यापैकी ओवरी पहिले असता तो भाग सपाट भासतो दरवर्षी नदीच्या पाण्यात व पुरात बुडणाऱ्या या घाटाचा एक चिरा सुध्दा हललेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात या ओवरीमध्ये गावातील शेतकरी — धान्याची साठवणूक करीत असत.[१०]

गेल्या दोन — तीन दशकात गावकऱ्यानी या चिरंतन वास्तुच्या रक्षणासाठी काही पावले उचलली. ग्रामस्वच्छता अभियानाच्या पार्श्वभूमीवरून या घाटाबद्दल जागृतता आणखी वाढली. कृष्णामाई दीपोत्सव अशा उपक्रमाच्या निमित्ताने घाटाची स्वच्छता होते. ऐतिहासिक वास्तुबरोबर गावची व परिसराची शान असलेला हा घाट चिरंतन परशुराम भाऊ पटवर्धनांच्या कार्याचे प्रतिक आहे.

## पट्टणकुडी – सर परशुरामभाऊ पटवर्धन समाधीस्थान (ता.चिकोडी, जि.बेळगांव) तासगांव संस्थानाचे तीर्थक्षेत्र –

धारातीर्थ म्हणजे रणांगण ते एक तीर्थक्षेत्रच असते. शिवपूर्व काळापासून म्हणजे इ.स. १६०० ते इ.स. १८१८ पर्यंतच्या काळात शेकडो कर्तबगार व महत्वाच्या, एखाद्या प्रसंगाने प्रसिध्द पावलेल्या व्यक्ती मरण पावल्या काही लढय्यात, काही वृध्द होऊन तर काही आजारपणाने मृत झाल्या. लढाईत मृत्युमुखी पडलेल्या तसेच विशेष कर्तबगारी दाखविलेल्या व्यक्तींची समाधीस्थळे आवर्जुन बांधली जात.[११]

उत्तरपेशवाईत नानासाहेब पेशव्याच्या सावनुर युध्द मोहिमेत अवघ्या वयाच्या चौदाव्या वर्षी हाती तलवार घेऊन सवाई माधवरावाच्या काळात दक्षिणेचा सेनाकर्ते बनलेल्या, तासगांव संस्थानाच्या परशुराम भाऊ पटवर्धनांनी दुसऱ्या बाजीरावाला विरोध केल्यामुळे (१७९६) कैदेत पडावे लागले.

बाजीराव पेशव्याच्या मनमानी कारभारामुळे मराठा राज्याचे मालक असलेले सातारचे छत्रपती विरोधात जाताच दुसऱ्या बाजीरावांनी परशुरामभाऊंना कैदेतून सोडवून सातारा येथे बंदोबस्तास पाठविले.

१७९९ मध्ये परशुरामभाऊंनी कोल्हापूर छत्रपती विरूध्द मोहिम हाती घेतली या दोन्ही सैन्यात पट्टणकुडी येथे लढाई झाली. या लढाईत जखमी होऊन परशुरामभाऊ धारातीर्थी पडले. मराठा राज्याचा मोठा आधारस्तंभ आपआपसातील संघर्षात कोसळला. परशुराम भाऊंच्या निधनानंतर त्यांचे पुत्र रामचंद्र आप्पा यांना दबवून बाजीराव पेशव्यांनी पटवर्धनांचे महत्व कमी केले.

पट्टणकुडी गावाबाहेर माळावर परशुरामभाऊंची समाधी आहे. परशुरामभाऊ पटवर्धनांची मुद्रा[१२] –

''श्री गणपती। श्रीमंत पंतप्रधानचरणी तत्पर।

रामचंद्रसुत परशराम निरंतर।।''

१७४० ते १८०० पर्यंत मराठी राज्यासाठी पटवर्धन घराण्याने मराठी राज्य रक्षिण्यासाठी पराक्रमाची शिकस्त केली दक्षिणेत दबदबा निर्माण करून पेशवाईत नाव कमावले साठ वर्षाच्या कारकीर्दीत या घराण्यातील तीस कर्ते पुरूष धारातिर्थी पडले.[१३] पटवर्धन घराण्यात पहिल्या प्रतीचे शूर व मुत्सद्दी योध्दे सर परशुरामभाऊंच्या बरोबर गोपाळराव गोविंद रामचंद्रहरी, निळकंठ — त्रिंबकराव, कोन्होराव त्रिंबक, महादेवराव कृष्ण, मेघःशाम रामचंद्र परशराम, रघुनाथराव, निळकंठ आप्पासाहेब सांगलीकर हे वीर पुरूष होते. पटवर्धन सरदार म्हणजे राज्यातील मोठे प्रस्थ होते शिंदे, होळकरानंतरचे परशुरामभाऊ पटवर्धन हे तिसरे सरदार होते.[१४]

पटवर्धनांना जो पुण्याच्या पेशवाईकडून जी जहागिरी सरंजाम म्हणून मिळाली होती. त्यात अनेक बळकट किल्ले, ठाणी असून त्यांच्या ताब्यात सुमारे ४० लाख रूपयाचा मुलुख होता आणि तो कि कृष्णेपासून तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश पसरला होता.[१५] परशुरामभाऊंनी भुदरगड किल्ला बांधला होता.

१७ सप्टेंबर १७९९ हा दिवस दक्षिणेतील मराठी सत्तेला धक्का देणारा ठरला आणि पेशवाईची चिंता वाढविणारा ठरला. परशुरामभाऊंच्या अचानक जाण्याने रणांगणावर पराक्रमाचा पराभव झाला आणि श्री सिध्दीविनायकाच्या मंदिरातील दीपमाळेतील दिवे आपोआप विझले. रयतेस तो अपशकुन वाटला. खरे तर तो दिवस शुभ शकुनांचा होता त्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. भाऊंच्या मृत्युच्या बातमीने सारे संस्थान गहिवरले आणि अख्खी पेशवाई हळहळली भाऊंच्या शत्रुला देखिल अतीव दुःख झाले असेल. रणांगणावरती तीन पुत्र पराक्रमाची शर्थ लावीत असताना मराठ्यांच्या या निधड्या सेनाकर्तेच्या मानेवर ती शत्रुच्या तलवारीचा घाव पडला असतानाही तीन ते चार शत्रु सैन्याला अस्मान दाखवित परशुरामभाऊ कोसळले. काळाने त्यांना अलिंगन दिले. या वर्तमानाने संस्थान गलितगात्र झाले. शत्रू ही विजयाच्या आनंदापेक्षा दुःखाने गारद झाला कारण मराठ्यांच्या एका पराक्रमी सरदारांची सांजवात झाली.

# स्वतंत्र भारताच्या सांस्कृतिक जडण घडणीतील श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन तासगांवकर यांचे योगदान

इ.स. १७९५ ते इ.स. १८०० ही ५ ते ६ वर्षे पेशवा / मराठा साम्राज्याच्या दृष्टीने अत्यंत विनाशकारी ठरली. बारभाईपैकी महादजी शिंदे, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन व नाना फडणीस ही सर्व जास्ती – जास्त कर्तबगार माणसे या कालखंडात काळाने ओढून नेली.

इ.स. १८०० मध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांनी मराठा साम्राज्याची सर्वच सरदारामधील सुंदोपसुंदीमुळे झालेली दुरवस्था पाहिली व अशा निष्कर्षाप्रत ते आले की, यशवंतराव होळकर दौलतराव शिंदे, बडोदेकर गायकवाड प्रभृति सरदार व स्वत: पेशवे यांच्यामधील कोणाचाच कोणावर विश्वास राहिला नव्हता एवढेच नव्हे तर एकमेकांवर कुरघोडी करून अगदी हिंसक मार्गानेही अंतर्गत शत्रु संपवण्याची सर्वांचीच माणसिकता होती.

या पार्श्वभुमीवर दुसरे बाजीराव पेशवे यांनी काहीसा लज्जास्पद, परंतु प्राप्त परिस्थितीत कमीत कमी रक्तपात व नुकसान होण्याचा मध्यम मार्ग स्विकारून ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीबरोबर सालबाईचा (इ.स. १८०२) तह केला. या तहान्वये पेशवे व त्यांच्या पटवर्धनासह सर्व सरदारांनी इंग्राजंच्या तैनाती फौजा स्विकारल्या. या फौजांनी छत्रपती, पेशवे, त्यांचे सरदार व सर्व अंकिता मांडली व यांना संरक्षण देयाचे ठरले. त्यामुळे ब्रिटीश कंपनीवाले व मराठा साम्राज्यातील युध्दे संपुष्टात आली खरे परंतु या तहामुळे मराठी साम्रज्य ब्रिटीशांचे मांडलीक झाले.

यानंतर पेंढाऱ्यांनी निर्माण केलेले अराजक व १८१८ मध्ये खडकीला झालेल्या व बापू गोखले सेनापती व पानसे तोफखाना वाले यांनी मर्दुमकीची शर्थ करून लढलेल्या चकमकीचा अपवाद तसेच तुरळक बंडाळीचे प्रकार सोडता या मांडलीकी अवस्थेत अत्यंत दुबळे व गलितगात्र झालेले मराठा साम्राज्य १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दात थंड होते.

१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन दुसऱ्या बाजीराव पेशवे यांना 'ब्रम्हवर्त' या कानपूर जवळच्या शहरात स्थानबध्द करून पूर्णत: निष्प्रभ केले.

पंजाब, उत्तरप्रदेश, दक्षिणेत, बंगालमध्ये वेगवेगळी नीति व अनीतियुक्त आयुधे व फर्माने वापरून एकापाठोपाठ राजे व सरदार, दरकदार, नबाब इत्यादींची संस्थाने / राज्ये (Princely States) 'जप्त' म्हणजे गिळंकृत करण्याचा समारा लावला. लॉर्ड डलहौसी या ब्रिटीश प्रमुखाने १८४८ नंतर 'दत्तक वारस' किंवा 'अज्ञान वारस' असे नवीन निकष जप्तीसाठी पात्र ठरवून शेकडो संस्थाने संपविली.

इ.स. १८५३ मध्ये तासगांव संस्थान 'अज्ञान वारस' या सबबीखाली खालसा करण्यात आले. जप्तीचे 'निकष' यापेक्षा संस्थानाची ताकद व प्रभाव हे खरे घटक पाहिले जात होते. त्यामुळे जयपूर, इंदूर, ग्वाल्हेर, नागपूर, सांगली, कोल्हापूर, म्हैसूर त्रावणकोर अशी बलशाली व मातब्बर संस्थाने टिकून राहिली. तर तासगांवसारखी छोटी संस्थाने कंपनीच्या बकासुरी प्रसरणांतील भक्ष्यस्थांनी पडली. मुद्दा असा की खालसा न झालेल्या संस्थानाला भारताच्या स्वतंत्र सरकारने इ.स. १९७० पर्यंत भरपूर तनखे आणि विशेषाधिकार (Privy Purses of Privileges) दिले. वास्तविक खालसा का जीवंत हा परकीयांचा निर्णय स्वतंत्र भारताने स्विकारण्याचे कारणच नव्हते. वैशिष्ट ठिकाणाचे ऐतिहासिक कलात्मक सांस्कृतिक, भौगोलिक, धार्मिक, पर्यटन विषयक असे पारंपारिक महत्व जतन करण्यासाठी ही तरतुद होती. पण गोष्टीचा विचार न झाल्यामुळे तासगांव सारख्या एकमेव द्वितीय ऐतिहासिक / सांस्कृतिक / सामाजिक / धार्मिक / कलात्मक परंपरांचे आगार असलेल्या नगराला कोणतीही आर्थिक मदत अगर शासकीय विशेष नोंद किंवा सहकार्य मिळाले नाही.

तरीही परशुरामभाऊ पटवर्धनांचे महात्म्य व महत्व एवढे विशाल आहे की, कोणतीही शासकीय मदत अथवा सहकार्य नसतानाही त्यांनी २४१ वर्षापूर्वी सुरू

केलेल्या सर्व धार्मिक, नित्य / नैमित्तीक परंपरा, कलाप्रकारांचे उत्सव इ. तेवढयाच आत्मीयतेने व वर्धिष्णु रूपामध्ये सतत सुरू आहेत.

एका विभूतीने एखाद्या भौगोलीक प्रदेशात संपूर्ण जनजीवनाची एक शैली, संस्कती व आपुलकी निर्माण केली आहे. जगात फार थोड्याच ठिकाणसी असे दृश्य दिसेल.

राजेंद्र पटवर्धन<br>
तासगांव संस्थान,<br>
श्री सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टी

# संदर्भसूची


१. मो.के.कुंटे – सांगली जिल्ह्यातील मंदिरे १९९८ पृष्ठ २१

२. कित्ता २ पृष्ठ ४१

३. रामचंद्र विठ्ठल कोळेकर, विठ्ठल मंदिर व्यवस्थापक – मुलाखत

४. महादेव सुबराव पाटील मुलाख व कित्ता ३ मंदिर माहिती

५. मो.के.कुंटे सांगली जिल्ह्यातील मंदिर १९९८ पृष्ठ ४३

६. रामचंद्र कोळेकर विठ्ठल मंदिर व्यवस्थापक – मुलाखत

७. बिडेश ढवळीकर श्री बिराडसिध्द – अक्षरदीप प्रकाशन, जून २०११ पृष्ठ ११

८. वा. वि. साळुंखे – मांजर्डे गावचा इतिहास, १९६७ पृष्ठ ६

९. तासगांव फेस्टिव्हल २०१७ प्रकाशन शेरशीक्क्ब – संपादक – डॉ अमर मस्के पृष्ठ २२

१०. https://myoutube.com upload by Sajid Attar

११. प्रविण भोसले – मराठ्यांची धारातीर्थे – शिवमुद्रा प्रकाशन, सांगली नोव्हेंबर २०१९ पृष्ठ ७४१

१२. प्रविण भोसले, कित्ता २ पृष्ठ ७४२

१३. संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी – २ मराठी विश्वकोश खंड ९ वा पृष्ठ ८२

१४. गो. वि. आपटे – पटवर्धन घराण्याचा इतिहास पृष्ठ १७६

१५. वासुदेव शास्त्री खरे – ऐतिहासिक लेख संग्रह – खडे १३ पृष्ठ ६९०४.

# प्रकरण ६

## संदर्भ साधने


१. तुळपुळे शं. गो. (संपादक) — सागर प्रकाशन, कोल्हापूर प्राचीन मराठी कोरीव लेख.

२. प्रा.वि.वि. कुलकर्णी — विद्या प्रकाशन नागपूर, मध्ययुगीन भारताचा इतिहास

३. प्रा.एन.ए. शिंदे, प्रा.थोरात, प्रा.गायकवाड, शिवाजी आणि शिवयुग

४. प्रा.एन.डी.पाटील, प्रा.अभय पाटील, मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास.

५. डॉ.सी.जी. पाटील, तासगांव तालुक्याच्या द्राक्ष शेतीचा इतिहास, पी.एच.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००७

६. राजेंद्र पटवर्धन श्री सिध्दीविनायक मंदिर, तासगांव ट्रस्टी — मुलाखत

७. राजेंद्र विठ्ठल कोळेकर, विठ्ठल मंदिर ट्रस्टी, तासगांव — मुलाखत

८. कृष्णारावजी पाटील — माजी मुख्याध्यापक — मुलाखत

९. रामचंद्र अनंत लागू, बायोग्राफी ऑफ गोपालगोविंद पटवर्धन

१०. रामचंद्र अनंत लागू, महाराष्ट्राची इभ्रत किंवा पटवर्धनांचे पराक्रम

११. प्रा.वल्लभदास शेळके, श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन लेख दै.अग्रदूत २००८

१२. स.मा.गर्गे — करवीर रियासत

१३. प्रा.जी.के.पाटील, दै.तरूण भारत लेख २६ ऑगस्ट २०१७

१४. मोडक बा. प्र., कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थानांचा इतिहास.

१५. सुनिल गायकवाड, सांगली, तासगांव बेदाणा मर्चंट स्मरणिका २०१९

१६. डॉ.जयसिंगराव पवार, मराठी सत्तेचा उदय – पृथ्वी पब्लीकेशन कोल्हापूर २००३
१७. सौ.संकपाळ एस. डी., दि.पटवर्धनस् ऑफ तासगांव, १९८९
१८. डेव्हलपमेंट प्लॅन बुक
१९. सांगली जिल्हा महाराष्ट्र गॅझेट १९९९
२०. साप्ताहिक सकाळ देवस्थान विशेषांक – मे २०१४
२१. स.स.सहस्त्रबुध्दे – सरदार परशुरामभाऊ पटवर्धन
२२. वा. वा. खरे – हरिवंशाची बखर
२३. सर परशुरामभाऊ पटवर्धन स्मरणिका २००३
२४. गो.वि.आपटे – पटवर्धन घराण्याचा इतिहास, भाग १
२५. धों.बा.सहस्त्रबुध्दे – पेशवाईतील सर परशुरामभाऊ पटवर्धन
२६. पुणे रेसिडेन्स रेकॉर्ड भाग ३
२७. प्रा.ना.सी.दीक्षित – मराठ्यांचा इतिहास, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स नागपूर, जून १९८७
२८. Siddharth Kattimani - Siddharth Research Evaluation Dec. 2013
२९. सहस्त्रबुध्दे स.अ. सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम.
३०. वा.वा. खरे – ऐतिहासिक लेख संग्रह खंड – ६
३१. प्रा.सरल धारणकर – मोंगल मराठा कालखंड
३२. दि.तासगांव फेस्टीव्हल २०१७ स्मरणिका
३३. स.मा.गर्गे – करवीर छ.घराण्याचा इतिहास १९८०
३४. चिंतामणी सहस्त्रबुध्दे – इतिहासाची सुवर्णपाने आदित्य प्रकाशन सांगली, २०१३
३५. डेव्हलपमेंट प्लॅन बुक क्रान्ती वैभव प्रकाशन, कोल्हापूर
३६. वा. वा. खरे – ऐतिहासिक लेख संग्रह खंड ९
३७. महाराष्ट्र राज्य गॅझेट – कोल्हापूर जिल्हा संपादक कि. का. चौधरी १९८९
३८. कले इतिहास तरूण भारत – १८ नोव्हेंबर २०१७

३९. मराठा कालातील ऐतिहासिक स्थळ दर्शन
४०. वा.वा.खरे – इचलकरंजी संस्थानाचा इतिहास
४१. दै. ज्ञानदर्शन – एज्युकेशन वार्ता – मणेराजूरी
४२. अ. रा. कुलकर्णी – मराठ्यांचा इतिहास – डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
४३. एल्फीन्स्टन एम. – टेरोटरीज कॉनक्युरड फॉर्म द. पेशवा रिपोर्ट पब्लीकेशर दिल्ली, १९७३
४४. मो. के. कुंटे – सांगली जिल्ह्यातील मंदिरे १९९८
४५. महादेव सु. पाटील – मुलाखत श्री सिध्देश्वर मंदिर अध्यक्ष
४६. बिडेश ढवळीकर – श्री बिराडसिध्द अक्षरदीप प्रकाशन – जून २०११
४७. बा. वी. साळुंखे – मांजर्डे गावचा इतिहास १९६७
४८. https://m.youtube.com uploaded by Sajid Attar
४९. प्रविण भोसले – मराठ्यांची धारातीर्थे – शिवमुद्रा प्रकाशन, सांगली नोव्हेंबर २०१९
५०. लक्ष्मण शास्त्री जोशी – मराठी विश्वकोष खंड – ९
५१. वा. वा. खरे – ऐतिहासिक लेख संग्रह खंड – १३